सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ०१ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ६० पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पूर्वोत्तर भारतात मुसळधार, १९ जणांचा मृत्यू

गुवाहाटी : पूर्वोत्तर भारतात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे आणि त्यातून झालेल्या भूस्खलनामुळे भीषण स्थिती निर्माण झाली आहे. मणिपुर, मिझोराम, आसाम, अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये पावसाचा प्रकोप आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला असून १२,००० हून अधिक कुटुंबांना बाधा पोहोचली आहे. अनेक घरांची पडझड झाली असून, नद्या धोक्याच्या पातळीवर वाहत आहेत. हवामान विभागाने या राज्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.



मिझोराममध्ये भूस्खलनाचा जबरदस्त फटका बसला आहे. लॉन्गतलाई शहरात एका डोंगर उतारावरून मातीच्या प्रचंड ढिगाऱ्याने पाच घरे आणि एक हॉटेल जमीनदोस्त केली. ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकले असून, बचावकार्य सुरू आहे. यंग लाई असोसिएशन, आपत्ती व्यवस्थापन दल आणि तिसऱ्या भारतीय राखीव बटालियनचे जवान घटनास्थळी तातडीने दाखल झाले आहेत. या भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग-५४ बंद झाला असून, लॉन्गतलाई आणि सियाहा या दोन भागांमधील संपर्क पूर्णतः तुटला आहे.

आसाममध्ये कामरूप मेट्रो जिल्ह्यातील भूस्खलनात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. गुवाहाटी, सिलचरसह पाच जिल्ह्यांतील १२,००० लोकांना पुराचा फटका बसला आहे. लखीमपूरमध्ये रिंगबांध फुटल्यामुळे पूरस्थिती गंभीर बनली आहे. गेल्या २४ तासांत गुवाहाटीत ९० ते १३४ मिमी पाऊस पडला असून, पुढील काही दिवसातही पावसाची तीव्रता कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

अरुणाचल प्रदेशात भूस्खलनाने सर्वाधिक ९ जणांचे प्राण घेतले. पूर्व कामेंग जिल्ह्यातील बाना-सेप्पा मार्गावर ७ जणांचा मृत्यू झाला, तर लोअर सुबनसिरी जिल्ह्यात २ मजुरांचा मृत्यू झाला. सिगिन नदी धोक्याच्या पातळीवर आहे. हवामान खात्याने १ ते ५ जूनदरम्यान जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. त्रिपुरात देखील पावसाचा जबरदस्त परिणाम दिसून आला. येथे पाण्यात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. १०६ घरे उद्ध्वस्त झाली असून, २०० हून अधिक लोक बेघर झाले आहेत. हावड़ा नदीचा पाण्याचा स्तर १०.०१ मीटर वर गेला आहे. मणिपुरमध्ये नम्बुल, इरिल आणि इम्फाल या प्रमुख नद्यांचे पाणी धोक्याच्या पातळीवर पोहोचले आहे. टेंग्नौपाल, उखरुल आणि सेनापती जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान खात्याने रेड अलर्ट जारी करत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. या मुसळधार पावसाने आणि नैसर्गिक आपत्तीमुळे पूर्वोत्तर भारतात जनजीवन विस्कळीत झाले असून, सरकार आणि बचाव यंत्रणा रात्रंदिवस मदतकार्य करत आहेत. मात्र, हवामान खात्याचा पुढील काही दिवसांचा अंदाज पाहता संकट अद्याप टळलेले नाही.

## भारताचं वर्चस्व कायम! गुलवीर सिंगचा 'डबल गोल्डन धमाका', तर पूजा सिंगची सोनेरी झेप

गुमी : आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून दाखवलीये. दक्षिण कोरियामधील गुमी येथे सुरु असलेल्या स्पर्धेत चौथ्या दिवसाअखेर भारत ८ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्य पदकासह पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. भारतीय खेळाडूंचा दबदबा आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे. आधी १०,००० मीटर शर्यतीत दमदार कामगिरी करत सुवर्ण जिंकणाऱ्या गुलवीरने आता ५,००० मीटर शर्यतीतही जोरदार मुसंडी मारत दुसरे सुवर्णपदक पटकावले.




## 'नीट-पीजी'ची आता एकाच शिफ्टमध्ये परीक्षा; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली :सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि. ३०) नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशनला नीट-पीजी परीक्षा २०२५ परीक्षा एकाच शिफ्टमध्ये घेण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने एनबीईचा नीट-पीजी परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्याचा निर्णय फेटाळून लावला. कारण अशा पद्धतीच्या परीक्षेमुळे मनमानी होईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.नीट-पीजी परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्याच्या एनबीईच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या याचिकांवरील सुनावणी करताना न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

## दहशतवादी कारवाई केली, तर 'करारा जवाब' देणार

### पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला इशारा

कानपूर : पाकिस्तानच्या सैन्याला भारतीय हवाई दलाच्या हल्ल्यांमुळे मोठा धक्का बसला असून, त्यांनी युद्धविरामाची विनंती केली. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांचा वापर करून शत्रूच्या भूमीत घुसून दहशतवादी तळ नष्ट केले, या ऑपरेशनद्वारे भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले करून मोठे यश मिळवले आहे. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही. पाककडून कोणतीही दहशतवादी कारवाई झाली, तर त्याला 'करारा जवाब' दिला जाईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा पाकिस्तानला दिला आहे. उत्तर प्रदेशच्या कानपूर येथे आयोजित सभेत शुक्रवारी ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभेत भारतीय लष्कराचे जोरदार कौतुक केले आणि 'ऑपरेशन सिंदूर'चा विशेष उल्लेख करत, ही कारवाई भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतेचे प्रतीक ठरल्याचे सांगितले. त्यांनी म्हटले की, ऑपरेशन सिंदूरने भारताच्या शत्रूंना हादरवून टाकले आणि ब्रह्मोससारख्या देशात तयार झालेल्या शस्त्रास्त्रांनी त्यांना झोप उडवली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी कारवायांना आता भारताकडून कडक उत्तर मिळेल. कानपुरी भाषेत सांगायचे तर, शत्रू जिथे असेल, तिथे त्याला धडा शिकवला जाईल. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांचा वापर करून भारताने



आत्मनिर्भरतेची प्रगती दाखवली आहे. ब्राह्मोस मिसाइल आणि इतर स्वदेशी शस्त्रास्त्रांनी शत्रूच्या भूमीत घुसून दहशतवादी तळ नष्ट केल्याचे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

भारताच्या शत्रूंना कठोर इशारा देताना मोदी म्हणाले, कोणीही भ्रमात राहू नये. ऑपरेशन सिंदूर दरम्यान जे शरण येत होते, त्यांनी हे लक्षात ठेवावे की ऑपरेशन संपलेले नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय मुलींचा व बहिणींचा संताप कृतीमध्ये रूपांतरित झाला, हे जगाने पाहिले. आम्ही पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ शेकडो मैल आत घुसून उद्ध्वस्त केले. या कारवाईनंतर पाकिस्तान इतका हादरला की, संघर्ष थांबवण्यासाठी त्यांना विनवण्या कराव्या लागल्या.

मोदी पुढे म्हणाले की, भारताने तीन गोष्टी स्पष्ट केल्या आहेत : प्रत्येक दहशतवादी हल्ल्याला कडक प्रत्युत्तर दिले जाईल व त्यासाठी वेळ, पद्धत आणि अट या भारतीय लष्कराच्या हातात असतील. अणू युद्धाच्या धमक्यांना भारत घाबरणार नाही. दहशतवादी कारवाया घडवणारे मास्टरमाइंड व त्यांना मदत करणारी सरकारे या दोघांनाही सारखेच उत्तर दिले जाईल. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा जुनाच डाव भारत मान्य करणार नसल्याचे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सांगितले.

मेक इन इंडियाचे कौतुक

मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरमुळे भारताच्या स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाचे सामर्थ्य जगापुढे आले.

## भाजपाकडून महाराष्ट्रातील उर्वरित जिल्हाध्यक्षांची घोषणा


तभा वृत्तसेवा.

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्यातील रिक्त राहिलेल्या जिल्हाध्यक्षपदांसाठीची निवड भाजपाकडून आज ३१ रोजी शनिवारी जाहीर करण्यात आली आहे. या माध्यमातून एकूण २२ कार्यकर्त्यांवर जिल्हास्तरावरील महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे. यापूर्वी भारतीय जनता पार्टीकडून राज्यातील काही जिल्ह्यातील अध्यक्षांची निवड करण्यात आली होती.


आज पक्षातर्फे राज्यातील उर्वरित जिल्हाध्यक्षपदांसाठीची निवड भाजपाकडून जाहीर करण्यात आली आहे. या माध्यमातून एकूण २२ कार्यकर्त्यांवर जिल्हास्तरावरील महत्त्वपूर्ण कार्यभार सोपवण्यात आला आहे. त्यामध्ये राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील



सुरेश भुमरे
जिल्हाध्यक्ष परभणी



किशोर शितोळे
छत्रपती संभाजीनगर



अनिल मोहिते
शहर जिल्हाध्यक्ष नगर

मिळून एकूण २२ नेत्यांच्या नावे जाहीर करण्यात आली आहे.

आज जाहीर करणयात आलेल्या जिल्ह्याध्यक्षांच्या यादीमध्ये पालघरच्या जिल्हाध्यक्षपदी भरत राजपूत, वसई-विरारच्या जिल्हाध्यक्षपदी प्रज्ञा पाटील, अहिल्यानगर शहरच्या जिल्हाध्यक्षपदी अनिल मोहिते, नाशिक शहरच्या जिल्हाध्यक्षपदी सुनील केदार, नाशिक दक्षिणच्या अध्यक्षपदी सुनील बच्छाव, नाशिक उत्तरच्या जिल्हाध्यक्षपदी यतीन कदम, पुणे दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी शेखर वडणे, कोल्हापूर शहरच्या जिल्हाध्यक्षपदी विजय जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

गडचिरोलीच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश बारसागडे, चंद्रपूर शहरच्या जिल्हाध्यक्षपदी सुभाष कासमगुट्टवार, चंद्रपूर ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी हरिश शर्मा, वर्ध्याच्या जिल्हाध्यक्षपदी संजय गाते, परभणी ग्रामीणच्या शहराध्यक्षपदी सुरेश भुबरे, छत्रपती संभाजीनगर शहरच्या जिल्हाध्यक्षपदी किशोर शितोळे, लातूर शहरच्या जिल्हाध्यक्षपदी अजित पाटील कव्हेकर, लातुर ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी बसवराज पाटील, नांदेड उत्तरच्या जिल्हाध्यक्षपदी किशोर देशमुख, नांदेड दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी संतुकराव हंबर्डे, बीडच्या जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

मुंबईमधील तीन जिल्हाध्यक्षांची निवडही करण्यात आली असून, मुंबईतील उत्तर पश्चिम मुंबईच्या जिल्हाध्यक्षपदी ज्ञानमूर्ती शर्मा, दक्षिण मध्य मुंबईच्या अध्यक्षपदी निरज उभारे आणि दक्षिण मुंबईच्या अध्यक्षपदी शलाका साळवी यांची निवड करण्यात आली आहे.

## जिल्हा उद्योग मित्र समितीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



अहिल्यानगर दि.३०- जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला. बैठकीस महाव्यवस्थापक संतोष गवळी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, उद्योग अधिकारी अशोक बेनके, बालाजी बिराजदार, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चरचे प्रकाश गांधी, जागतिक बँक प्रकल्पाचे उपकार्यकारी अभियंता अभय भांगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता यु ए बोरुडे, पोलीस निरीक्षक यशवंत बाविस्कर, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे प्रवीण कुमार तेली, महाराष्ट्र मेकॅनिकल इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, आमी संघटनेचे अध्यक्ष श्री खाकाळ यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.पंकज आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करण्यात यावीत. औद्योगिक क्षेत्रातील अनधिकृत स्टॉल तातडीने हटवण्यात यावेत. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेच्यादृष्टीने पोलीस गस्त वाढवण्यात यावी. औद्योगिक क्षेत्राला पुरेशा प्रमाणात व विनाअडथळा विद्युत पुरवठा करण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी. सनफार्मा ते निंबळक रस्ताचे कामही तातडीने करण्यात यावे. क्षेत्रामधील ड्रेनेजची स्वच्छता करण्यात यावी. त्याचबरोबर कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावत परिसर स्वच्छ राहील यादृष्टीनेही आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना आयुष्यमान भारत योजनेतून आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी ई-बस सुविधा सुरु करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना करत औद्योगिक क्षेत्रातील सोयी-सुविधांच्या अनुषंगाने विस्तृत आढावाही डॉ. आशिया यांनी यावेळी घेतला. यावेळी नेवासा व श्रीरामपूर औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती, स्ट्रीट लाईट, भूखंडवाटप, निवासी क्षेत्र, अग्निशमन यंत्रणा, राष्ट्रीयकृत बँकेची उभारणी यासह इतर विषयांचा आढावाही जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.



लातूर
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत लातूरच्या करणला सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
नेपाळची राजधानी काठमांडू येथे नुकत्याच पार पडलेल्या दहाव्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्राच्या ८ खेळाडूंनी काता व कुमिते या दोन्ही प्रकारामध्ये ५ सुवर्ण, ३ रौप्य व ८ कास्य पदकांची कमाई करून घवघवीत यश संपादन केले. यात लातूरच्या युनिव्हर्सल अकॅडमीच्या कराटेपटूनी चमकदार अशी कामगिरी केली आहे.



काठमांडू येथे झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे उद्घाटन नेपाळचे उपपंतप्रधान प्रकाश मान सिंग, नॅशनल स्पोर्ट्स कौन्सिलचे अध्यक्ष सांगा महाराजन व नेपाळ कराटे फेडरेशनचे अध्यक्ष युवराज लामा हस्ते झाले. या स्पर्धेत काता व कुमिते अशा दुहेरी प्रकारांमध्ये लातूरच्या युनिव्हर्सल कराटे मार्शल आर्ट अकॅडमीच्या करण भाऊराव पवार, सम्राट राजभाऊ सूर्यवंशी, शिवम वाल्मीक सोमवंशी, आदित्य राम जगदाळे, गौरव प्रकाश कोरे, अतुल बब्रुवान जाधव, यश विजय चौगुले, अजिंक्य गौतम कांबळे यांनी घवघवीत यश संपादन केले. अटीतटीच्याच्या अंतिम खुल्या काता स्पर्धेत लातूरच्या करण भाऊराव पवार याने नेपाळ संघाच्या दिपक थारू याला १२ गुणांनी नमवून प्रथम क्रमांकासहीत सुवर्ण पदक पटकाविले. या सर्व विजेत्या खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षण व राष्ट्रीय पंच शिहाण तुषार अवस्थी यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## अतिवृष्टीचा तालुक्यातील २३० हेक्टर्सवरील पिकांना फटका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
लातूर शहरासह परिसरात मंगळवारी दुपारी दोन तासांत झालेल्या अतिवृष्टीत लातूर, कासारखेडा, हरंगुळ महसूल मंडळात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेकांच्या घरात पाणी शिरले. काही जणांच्या भिंती पडल्या, तर टरबूज, तीळ, टोमॅटो आदी जवळपास २३० हेक्टर्सवरील पिकांचे नुकसान झाले. महसूल प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्यात आले आहेत.

लातूर शहरात मंगळवारी जोरदार पाऊस झाला. शहरातील रस्ते, नाल्या तुंडुब भरून वाहत होत्या. अनेक भागांत नागरिकांच्या घरात पाणी शिरले. अतिवृष्टीत टरबूज व टोमॅटोचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. शहरालगत असलेल्या गावांमध्ये अनेक शेतकरी भाजीपाल्याची लागवड करतात. मंगळवारी लातूर शहर व परिसरातील बहुतांश गावांत दोन तासात तब्बल २५ मि.मी. पाऊस झाल्याची नोंद झाली आहे. यात जमिनीचेही नुकसान झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची ओरड झाली. यामुळे महसूल विभागाकडून नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. दोन दिवसांपासून कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, महसूलचे तलाठी, मंडळ अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करीत आहेत. लातूर तालुक्यातील चार महसूल मंडळांत अतिवृष्टीत सर्वाधिक नुकसान कासारखेडा, हरंगुळ, कन्हेरी भागात झाल्याची माहिती तहसीलदार तांदळे यांनी दिली आहे.

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात एलपीजी गॅस सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार आणि निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन समिती सभागृहात एलपीजी गॅस सुरक्षितता आणि आगीपासून संरक्षण या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी संगीता टकले होत्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी पंकज मंदाडे, तहसीलदार राजाभाऊ कदम, ज्ञानेश्वर काकडे, वर्षा मनाळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी आणि लातूर शहर महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी उपस्थित होते. सूर्या गॅस सेफ्टीचे व्यवस्थापक सॅम्युअल डिसूजा यांनी घरगुती गॅस सुरक्षितता आणि उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी यांनी फायर एक्सटिंग्विशरच्या वापराबाबत माहिती देत त्याचे प्रात्यक्षिक सादर केले.

## यंदा यशवंत पंचायत राजमध्ये जि. प. सहभाग नोंदवणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
नेहमीच उत्कृष्ट करण्यासाठी परिचित असलेल्या लातूर जिल्हा परिषदेला २०२२-२३ चा यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियानचा राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार मंगळवारी प्रदान करण्यात आला. यापूर्वी लातूर जि. प.ला राज्यस्तरीय पुरस्कार दोनवेळा मिळाला. यंदा जि. प. अभियानात पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे.

हल्ली लातूर जि. प.तील अधिकाऱ्यांची टीम नवखी असली तरी नाविन्यपूर्ण करण्याची त्यांच्यात धमक आहे. या नाविन्यपूर्णतेच्या नावाखाली अधिकारी यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियान स्पर्धेत उतरून राज्यस्तरीय पुरस्कार मिळवतील, अशी चर्चा गुरूवारपासून जि. प. वर्तुळात आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये राज्यस्तरीय टीम जेव्हा लातूर जिल्हा परिषदेच्या तपासणीसाठी आली, त्यावेळी सर्व अधिकारी नुकतेच बदलून आले होते. तरी देखील अधिकाऱ्यांनी राज्यस्तरीय टीमसमोर उत्तम प्रेझेंटेशन केले. नुकत्याच आलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रेझेंटेशन करतेवेळी काही बाबी राहिल्या असतील; पण उत्तमोत्तम मांडणी करण्याचा प्रयत्न केला. यामुळेच राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार प्राप्त झाला. आता नवखे अधिकारी आता जुने होत आहेत. त्यांना लातूर जिल्हा परिषदेच्या लौकिकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. अभियान स्पर्धेत उतरण्याच्या संकेताला लातूर जि. प.चे अतिरिक्त सीईओ अस्लम तडवी यांनी दुजोरा दिला.

# लातूर बाजार समितीतर्फे चाकरवाडीला अन्नसेवा रवाना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
श्री क्षेत्र चाकरवाडी येथील सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माउली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ आणि आंतरराष्ट्रीय शिवकथा प्रवक्ते पं. प्रदीप मिश्रा (सिहोरवाले) यांच्या कथेच्या अनुषंगाने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व घटकांच्यावतीने एकूण २४ लाख ८ हजार रुपयांचे अन्नधान्य दोन ट्रकच्या माध्यमातून चाकरवाडीला रवाना करण्यात आले.

लातूर ग्रामीणचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले आणि मान्यवरांच्या हस्ते या ट्रकचे विधिवत पूजन करण्यात आले. या उपक्रमात लातूर बाजार समितीमधील सर्व आडते, गुमास्ते, हमाल - मापाडी, गाडीवान अशा सर्व घटकांचा हिरिरीने सहभाग असतो.

स्व. पांडुरंग लोया यांच्या प्रेरणेने मागच्या सलग ३० वर्षांपासून हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. यावर्षी ज्ञानेश्वर माउली महाराजांचे २५ वे पुण्यस्मरण आहे. त्यानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी तसेच पं. प्रदीप मिश्रा यांची श्री शिवमहापुराण कथा ८ ते १४ जून २०२५ या कालावधीत होणार आहे. या सोहळ्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक चाकरवाडी येथे येणार आहेत. त्यासाठी महाप्रसादाची एक दिवसाची सेवा लातूर बाजार समितीमधील सर्व घटकांकडून दिली जाणार आहे.

यावेळी माजी आमदार शिंदे म्हणाले, लातूरच्या आडत व्यापारी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार हा उपक्रम स्तुत्य आहे. अन्नसेवेचा हा पायंडा यापुढील काळातही अखंडितपणे सुरू रहावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविकात अशोक (गट्टुसेठ) अग्रवाल म्हणाले, यावर्षी एकूण २४ लाख ८ हजार रुपयांचा निधी संकलित झाला असून त्यातून ६०१ तेल डब्बे, ४६ कट्टे



साखर, ५५ कट्टे तूर डाळ, १८५ कट्टे चणा डाळ, गहू - तांदुळ आदी सामग्री पाठवण्यात येत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन रमेश सूर्यवंशी यांनी केले तर आभार बालाप्रसाद बिदादा यांनी मानले. यावेळी बाजार समितीचे पदाधिकारी आणि संचालकासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत आमचा वाटा महत्वाचा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
राज्यातील महायुतीचे सरकार स्थापण्यात ओबीसी, व्हिजेएनटीचा वाटा मोठा आहे. त्यामुळे त्यांचे सर्वांगिन विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात ओबीसी, व्हिजेएनटी समाजाची निर्णायक अशी महत्वाची भूमिका असेल, असा दावा शिवसेना ओबीसी, व्हिजेएनटीचे प्रदेशाध्यक्ष तथा मार्गदर्शक बाळासाहेब किसवे यांनी लातूर येथे केले.



शिवसेना प्रणित भटके विमुक्त जाती जमाती सेनेच्या वतीने प्रदेशाद्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी ३३ जिल्ह्यात ३३ दिवस संवाद दौरा केला. या संवाद दौऱ्याचा समारोप लातूर येथील दयानंद सभागृहात करण्यात आला.

त्यावेळी या भव्य महामेळाव्याला संबोधित करताना बाळासाहेब किसवे हे बोलत होते. यावेळी रामभाऊ पंडागळे, मुख्य मराठवाडा महिला ओबीसी अध्यक्ष पुष्पा मुंडे, जिल्हा शिवसेना सह संपर्क प्रमुख श्रीनिवास क्षीरसागर, जिल्हा प्रमुख सचिन दाने, ब्रह्मजी केंद्रे ओबीसी व्हिजेंटी जिल्हा प्रमुख विशाल भैय्या देवकते, सोलापूर जिल्हा प्रमुख सुयश करचे, सातारा जिल्हा प्रमुख हेमंत भोईटे, पुणे जिल्हाप्रमुख योगेश धरम, मराठवाडा सह संपर्क प्रमुख पंढरी जयनुरे, ओबीसी प्रवक्ते परमेश्वरराज घोडके, धाराशिव जिल्हा प्रमुख कमलाकर दाने, महिला जिल्हा प्रमुख अर्चना बिराजदार, उर्मिलाताई भगत, सातारा महिला जिल्हा प्रमुख चांदणी मुळे,सोलापूर महिला जिल्हा प्रमुख पदमजा इंगोले, परभणी महिला जिल्हा प्रमुख संगीताताई सत्वधर, युवा सेना जिल्हा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, संभाजीनगर जिल्हा प्रमुख दत्ताभाऊ म्हेत्रे, विशाल सगर, मयूर मोहिते शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सचिन दाने आदींची या संवाद दौऱ्यात प्रमुख प्रमुख उपस्थिती होती.

प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे म्हणाले की, सद्याचे उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या कार्यकाळात शासनाच्या विविध कल्याणकारी, लोकहिताच्या योजना समाज घटकापर्यंत पोहचल्या. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि इंडियन डेंटल असोसिएशन लातूर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी संगीता टकले होत्या.

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संदीप कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी पंकज मंदाडे, तहसीलदार राजाभाऊ कदम, ज्ञानेश्वर काकडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, इंडियन डेंटल असोसिएशनचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. शिल्पा लठुरिया, सचिव डॉ. शैलेश पडगिलवार, डॉ. साफल्य कडतने, डॉ. नीलम जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाचे डॉ. अरुण बालकुंदे, डॉ. आनंद कलमे, डॉ. माधुरी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. नीलम जाधव यांनी केले. त्यांनी तंबाखूविरोधी जनजागृतीविषयी मार्गदर्शन केले.

## ३ वर्षीय मुलगा ६ दिवसांपासून बेपत्ता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
गुमास्ता कॉलनी भागातील स्वरूप भिमाशंकर स्वामी हा तीन वर्षीय मुलगा दि. २६ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास बेपत्ता झाल्याची घटना घडली. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हनुमान मंदिर परिसरात मुलगा स्वरूप खेळण्यासाठी घराबाहेर पडला. परंतु घरी परत आलाच नाही.

गोल चेहरा, गोरा वर्ण, ऊंची दोन फूट पाच इंच, अंगात हिरव्या रंगाचा चौकडा शर्ट, पांढरी पँट, गळ्यात काळ्या दोऱ्यात सोन्याचा बदाम, डाव्या हातात व डाव्या पायात काळ्या रंगाचा दोरा, अशा वर्णनाचा मुलगा आढळून आल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीतील नुकसानीचे पंचनामे सुरू

### काँग्रेसचे पदाधिकारी धावले नुकसानग्रस्तांच्या मदतीला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
लातूरला मान्सूनपूर्व अतिवृष्टीचा फटका बसल्याने माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या आवाहनानंतर काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि प्रशासन लातूरकरांच्या मदतीला धावले असून तालुक्यातील खाडगाव, कासारगाव, महापूर येथे पाहणी करून नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत.

लातूर शहर आणि परिसरातील गावांमध्ये मान्सूनपूर्व अतिवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. शहराच्या सखल भागांमध्ये आणि गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून, गावात, शेतात आणि रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहत होते. अनेक सखल भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने



नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी तातडीने जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि महापालिका यंत्रणेला नागरिकांची काळजी घेण्याचे निर्देश दिले होते. तसेच, त्यांनी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आपापल्या परिसरातील नागरिकांना मदत करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत, माजी आमदार वैजनाथ शिंदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, विलास बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. समद पटेल, सभापती जगदीश बावणे, विजय देशमुख, प्रवीण सूर्यवंशी यांनी तत्काळ त्या गावी जाऊन पाहणी केली. शुक्रवारी (दि.३०) सकाळी खाडगाव येथे जाऊन पडझड झालेल्या घरांची त्यांनी पाहणी केली, कासारगाव येथे पुलाची आणि नाल्याची पाहणी केली तर महापूर गावात जाऊन पडझड झालेल्या घरांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. या नुकसानीची माहिती घेतली असून नुकसानीचे पंचनामे प्रशासकीय स्तरावर वेगाने सुरू आहेत.

यावेळी खाडगाव येथे सरपंच नेताजी देशमुख, ग्रामसेवक उत्तम गोमसाळे, देवानंद जाधव, शरद देशमुख, दौलत देशमुख, अनंत देशमुख, आयुब मुजावर, अल्का मगर, कासारगाव येथे चेअरमन गोपाळ भंडे, उपसरपंच जयदेव मोहिते, सरपंच बगाडे, संभाजी कांबळे, तर महापूर येथे सरपंच संदीप माने, पंडीत ढमाले, अनंत माने, लक्ष्मण भोसले, हुसेन सय्यद आदी उपस्थित होते. या मदतकार्यामुळे नागरिकांना दिलासा मिळत असून, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संकटकाळात केलेल्या कार्याचे कौतुक होत आहे.

# आमदार कराडांचा वाढदिवस विधायक उपक्रमाने साजरा

### रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, महिला भजनी मंडळांना साडी-चोळीचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मे -**
गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे, शेतकरी, शेतमजुरांच्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष करणारे भाजपचे नेते, लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांचा वाढदिवस शुक्रवारी उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्त मतदारसंघातील दोनशेहून अधिक महिला भजनी मंडळांना साडी- चोळीचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिर, शालेय साहित्याचे वाटप, वृक्षारोपण यासह विविध विधायक उपक्रम राबवण्यात आले. अनेक गावांतील ग्रामदेवतांची महापूजा करण्यात आली.

लातूर येथील एमआयटी परिसरात आमदार रमेशअप्पा कराड मित्रमंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित राहून भाजपसह विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह हजारोंनी सत्कार करून आमदार रमेश कराड यांना शुभेच्छा दिल्या. अभिष्टचिंतन सोहळ्यास ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांनी गर्दी केली होती. यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी तुळशीराम कराड, संजीवनीताई कराड, राजेश कराड, ऋषिकेश कराड, पृथ्वीराज कराड यांच्यासह कराड परिवारातील सदस्य होते. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

सकाळी असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिरात आमदार कराड यांनी महापूजा व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. आमदार कराड मित्र मंडळाच्यावतीने लातूर ग्रामीण मतदारसंघातील विविध गावांतील दोनशेहून अधिक महिला भजनी मंडळांतील प्रत्येकी वीस याप्रमाणे तब्बल सव्वाचार हजार महिला भजनींना साडी-चोळीचे वाटप करण्यात आले. मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांच्यावतीने तीन हजार शालेय विद्यार्थ्यांच्या स्कूल बॅग तसेच मंडल अध्यक्ष प्रताप पाटील यांच्यावतीने एक हजार शालेय विद्यार्थ्यांना पावसाळी छत्रीचे वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. तर मंडल अध्यक्ष सूरज शिंदे यांच्यावतीने दहा फुट उंचीच्या विविध शंभर फळ झाडांच्या वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला. मुरूड येथे कचरा कुंड्यांचे वाटप करण्यात आले. अनेक गावागावांत भाजप कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांना अभिषेक, महापूजा व आरती करून प्रार्थना केली.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधानपरिषद सभापती राम शिंदे, उच्च शिक्षण मंत्री



चंद्रकांत पाटील, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांनी दूरध्वनीवरून आमदार कराड यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## न्यू निस्सान मॅग्नाइट आता सीएनजी रिट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर- निस्सान मोटर इंडियाची लोकप्रिय एसयूव्ही न्यू निस्सान मॅग्नाइट आता सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध असेल. सीएनजी किट देशाच्या नियामक मानकांनुसार मोटोझेन (तृतीय पक्ष) द्वारे पूर्णपणे विकसित, उत्पादित आणि गुणवत्ता हमीसह असेल. मोटोझेन किटमधील घटकांसाठी वॉरंटी देईल. या उपक्रमातून ग्राहक-केंद्रित उपाययोजना प्रदान करण्यावर भर दिला जाईल. या किट्सचे फिटिंग सरकारी मान्यताप्राप्त फिटमेंट केंद्रांवर केले जाईल. संपूर्ण रेट्रोफिटमेंट फक्त ७४,९९९ रुपयांच्या स्पर्धात्मक अतिरिक्त किमतीत उपलब्ध असेल.

## इन्सोलेशन एनर्जी लिमिटेड चा निव्वळ नफा १२७.५०टक्के ने वाढला.

मुंबई - भारतातील आघाडीची सोलर पॅनल उत्पादक कंपनी इन्सोलेशन एनर्जी लिमिटेड ने ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचे आर्थिक निकाल सादर केले आहेत. एकत्रित ताळेबंदानुसार, या कालावधीत कंपनीने १३३३.७६ कोटी रुपयांची उलाढाल केली, जी गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत ७३७.१७ कोटी रुपयांनी कमावली होती, जी गेल्या वर्षीपेक्षा ८०.९३% जास्त आहे. या कालावधीत, कंपनीचे एकूण नफा १२४.३३ कोटी रुपयांवरून २३१.७९ कोटी रुपयांवर पोहोचले आहे जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ८६.४४% जास्त आहे. याच कालावधीत कंपनीने ८४.१७ कोटी रुपयांच्या तुलनेत १७०.३२ कोटी रुपयांचा ईबीआईटीडीए मिळवला जो गेल्या वर्षीच्या तुलनेत १०२.३५% जास्त आहे.या कालावधीत, कंपनीने ५५.४७ कोटी रुपयांच्या तुलनेत १२६.१९ कोटी रुपयांचा करपश्चात निव्वळ नफा कमावला आहे. जे गेल्या वर्षीपेक्षा १२७.५०% जास्त आहे.

## अल्काटेलने नवीन वी 3 स्मार्टफोन मालिका लाँच केली

पुणे - प्रसिद्ध फ्रेंच तंत्रज्ञान ब्रँड अल्काटेलने भारतात त्यांची बहुप्रतिक्षित वी ३ मालिका लाँच करण्याची घोषणा केली आहे. या मालिकेत तीन नवीन स्मार्टफोन समाविष्ट आहेत - व्ही३ अल्ट्रा, व्ही३ प्रो आणि व्ही३ क्लासिक, जे विशेषतः भारतातील तरुणांसाठी डिझाइन केलेले आहेत. हे स्मार्टफोन भारतात प्रथमच एनएक्सटीपेपर डिस्प्ले तंत्रज्ञानासह येतात, जे डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या जगात एक प्रमुख टप्पा आहे. अल्काटेलची एनएक्सटीपेपर डिस्प्ले तंत्रज्ञान स्मार्टफोन स्क्रीनच्या जगात एक जबरदस्त पाऊल आहे. यात ४-इन-१ डिस्प्ले मोड आहे जो सर्व प्रकाश परिस्थितीत दोलायमान रंग, कागदासारखी वाचनीयता आणि डोळ्यांचे संरक्षण प्रदान करतो. हा डिस्प्ले चार वेगवेगळ्या मोड्समध्ये स्विच करू शकतो - रेग्युलर मोड, इंक पेपर मोड, कलर पेपर मोड आणि मॅक्स इंक मोड - ज्यामुळे वापरकर्त्याला एक वर्धित आणि कस्टमाइज्ड अनुभव मिळतो. या नवीन तंत्रज्ञानामुळे भारतीय वापरकर्त्यांचा स्मार्टफोन वापरण्याचा मार्ग पूर्णपणे बदलणार आहे, मग ते अभ्यास असो, ब्राउझिंग असो किंवा कंटेंट तयार करणे असो.

## टेरा मोटर्सने ई-ऑटो केयोरो+ लाँच केले

मुंबई- भारतातील शहरी गतिशीलतेच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जपानी जएच् टेरा मोटर्सने त्यांची केयोरो+ इलेक्ट्रिक ऑटो लाँच केली आहे. नवी दिल्लीतील हॉटेल द ललित येथे झालेल्या या लाँच कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांच्यासह आघाडीचे उद्योग नेते आणि धोरणकर्ते उपस्थित होते. हा कार्यक्रम ई-मोबिलिटीबद्दल वाढत्या उत्साहाचे प्रतिबिंबित करतो.टेरा मोटर्सने भारतात आधीच १ लाखाहून अधिक इलेक्ट्रिक रिक्षा विकल्या आहेत आणि आता या नवीन मॉडेलसह कंपनी इलेक्ट्रिक तीन चाकी वाहनांच्या बाजारपेठेत ५-८% हिस्सा काबीज करण्याचे उद्दिष्ट ठेवते. कंपनीची योजना आहे की २०२५ च्या अखेरीस संपूर्ण भारतात १०० डीलरशिप स्थापन कराव्यात आणि मासिक उत्पादन ५,००० युनिट्सपर्यंत वाढवावे. केयोरो+ सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी, कंपनी शून्य डाउन पेमेंट आणि पहिल्या तीन सेवा भेटी मोफत देत आहे.

## फ्लिपकार्टकडून ग्लॅम अप फेस्ट २०२५ चे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : फ्लिपकार्टकडून भारतातील सर्वात मोठा सौंदर्य आणि लाइफस्टाइल उपक्रम असलेल्या ग्लॅम अप फेस्ट २०२५ च्या तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन ६ आणि ७ जून रोजी नेस्को, गोरेगाव, मुंबई येथे करणार आहे. हा कार्यक्रम दोन दिवस चालेल. त्यात देशभरातील ६,०००+ इन्फ्लूयुएन्सर्स आणि निर्मात्यांसह १००+ आघाडीचे ब्युटी, सौंदर्यप्रसाधने आणि के-ब्युटी ब्रँड सहभागी होतील. सौंदर्य, नावीन्यपूर्णता आणि कंटेंटचा एक दिमाखदार उत्सव म्हणून आयोजित करण्यात आलेल्या ग्लॅम अप फेस्ट २०२५ के-ब्युटीमध्ये फ्लिपकार्टचे नेतृत्व मजबूत करतो. त्यात व्यापक ब्रँड अनुभव, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून संशोधन आणि ग्राहक सक्रियता यांचा समावेश आहे.

## कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच : रविंद्र चव्हाण

मुंबई, आमदार रविंद्र चव्हाण यांनी भाजपा कार्यकारी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कार्यशैलीने संघटनेत गतिमानता आणल्याचे दिसून येत आहे. डोंबिवलीसारख्या भाजपाच्या बालेकिल्ल्यातून आमदार म्हणून सलग चार वेळा निवडून येणाऱ्या रविंद्र चव्हाण यांनी भाजपाच्या उजव्या विचारसरणीचा झेंडा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याबरोबरच राज्यातील विविध पक्षांतील अनेक महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या अंगीकृत संस्था त्याचसोबत विविध समाज घटक यांना भाजपाच्या प्रवाहात आणण्याचा झपाटा रविंद्र चव्हाण यांनी लावला आहे.

## एका वर्षात ५,००० हून अधिक मॅनहोल साफ केले

छत्रपती संभाजी नगर - छत्रपती संभाजी नगरमध्ये प्रगत रोबोटिक स्कॅव्हेंजर (रोबोटिक सफाई कामगार) बँडीकूट मोबिलिटी+ लाँच केल्यापासून एक वर्षानंतर शहर भूमिगत स्वच्छता पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवत आहे. राष्ट्रीय स्टार्टअप-पुरस्कार विजेत्या जेनरोबोटिक इनोव्हेशन्स प्रायव्हेट लिमिटेडने विकसित केलेल्या बँडीकूट मोबिलिटी+ रोबोटने मॅन्युअली कचरा साफ करण्याची गरज दूर केली आहे, तसेच ऑपरेशनल कार्यक्षमता आणि किफायतशीरतेत मोठ्या प्रमाणात सुधारणा केली आहे. गेल्या बारा महिन्यांत, दोन बँडीकूट मोबिलिटी+ युनिट्सनी शहरातील विविध झोनमधील ५,००० हून अधिक मॅनहोल साफ केले आहेत, ज्यामध्ये १२ मीटर खोल चेंबर्सचा समावेश आहे. प्रत्येक कोपऱ्यात पोहोचणारे प्रगत रोबोटिक आर्म आणि स्वयंचलित कचरा संकलन व स्टोरेज सिस्टमने सुसज्ज हे रोबोट सुरक्षितपणे स्वच्छता करतात, ज्यासाठी मानवी हस्तक्षेपाची गरज भासत नाही.

## ‘कॅप्टन कूल’ एम.एस. धोनी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त

छत्रपती संभाजीनगर : भारतातील आघाडीचा जंतूसंरक्षण ब्रँड डेटॉलने क्रिकेट आयकॉन आणि भारताचा मूळ ‘कॅप्टन कूल’ महेंद्रसिंह धोनी यांना आपल्या डेटॉल साबण, बॉडीवॉश आणि हँडवॉश श्रेणीसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. ही अनोखी भागीदारी एका दिग्गज कूल व्यक्तिमत्त्वाला आणि विश्वसनीय कूल ब्रँडला एकत्र आणते, आणि उष्णतामानातही कूल राहण्याचा उपाय सादर करते अर्थात डेटॉल आयसी कूल. ३ पट तीव्र थंडावा आणि ९९.९ % त्वचा संक्रमण निर्माण करणाऱ्या जंतूंपासून संरक्षण देणारा डेटॉल आयसी कूल हा उन्हाळ्यासाठी एक परिपूर्ण पर्याय आहे.

## दादासाहेब सोले पाटील यांचे निधन



नगर- पंकज कॉलनी, सावेडी येथील रहिवासी व सेवानिवृत्त रेल्वे अधिकारी दादासाहेब नारायण सोले पाटील (वय ९०) यांचे ३० मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांचे मुळ गांव अरणगांव ता. जामखेड होते.त्यांच्यामागे, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जेष्ठ विधिज्ञ प्रा. नीळकंठ सोले पाटील यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. जिल्हा सहकारी बॅंकेचे जनसंपर्क अधिकारी भारत सोले पाटील यांचे चुलते तर एडीसीसी बॅंकेचे स्टेशनरोड शाखेचे शाखाधिकारी संजय सोले पाटील यांचे ते वडील होत.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘लोकराज्य’चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विशेषांक प्रकाशित




अहिल्यानगर, दि. ३१ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने त्यांच्या जीवनकार्यावर आधारित ‘लोकराज्य’च्या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित या प्रकाशनाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आणि ‘लोकराज्य’चे मुख्य संपादक तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली या अंकाची निर्मिती करण्यात आली आहे. अंकाच्या मुखपृष्ठावर अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने तयार करण्यात आलेले बोधचिन्ह आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महाराष्ट्रातील कार्य, धर्मपरायणता, समाजकार्य, राज्यकारभाराचा आदर्श, दातृत्व, तसेच त्यांनी उभारलेल्या विविध वास्तूंची माहिती अंकात देण्यात आली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनाविषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध मान्यवरांनी लिहिलेले लेख अंकात समाविष्ट आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेसह शासनाने जन्म त्रिशताब्दी निमित्त घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहितीदेखील या अंकात देण्यात आली आहे. अंकाच्या प्रकाशन प्रसंगी आमदार गोपीचंद पडळकर, मोनिका राजळे, शिवाजीराव कर्डीले, सुरेश धस, विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, अमोल खताळ, माजी मंत्री आण्णा डांगे, बबनराव पाचपुते, स्नेहलता कोल्हे, रमेश शेंडगे, प्रा.लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ.पकंज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय युवा शिबिराचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.३१ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि राष्ट्रीय युवा संघटन वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १ ते ७ जून २०२५ या कालावधीत गांधेली येथील एमजीएम विद्या अरण्यममध्ये राष्ट्रीय युवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम आणि गांधी पिस फाउंडेशनचे अध्यक्ष कुमार प्रशांत यांच्या मुख्य मार्गदर्शनातून आयोजित करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही ही शिबिराची मुख्य संकल्पना असून भारतीय संविधानातील मूलभूत मूल्यांवर चिंतन व समृद्ध संवाद साधण्यासाठी देशभरातील युवक एकत्र येणार आहेत. या शिबिरादरम्यान सहभागी विद्यार्थी पर्यावरणपूरक जीवनशैली, सामाजिक सलोखा आणि जबाबदार नागरिकत्व यावर आधारित विविध सत्रांमध्ये भाग घेणार आहेत.

शिबिरात योगा, श्रमदान, आंतरधर्मीय प्रार्थना, संध्याकाळी चौपाल, खेळ, देशभक्तीपर गीत गायन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरण दिन, क्रांती दिन आणि योग दिन यांचा सन्मान राखत या संपूर्ण सप्ताहात युवकांसाठी विचारविनिमय, प्रेरणादायी संवाद आणि ज्ञानवर्धन होईल.

छत्रपती संभाजीनगर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी देवगिरी किल्ला, अजंठा-एलोरा लेणी, बिबी का मकबरा हे या शिबिराचे वैशिष्ट्य ठरणार असून हे सहभागी शिबिरार्थिना पाहता येणार आहे. एमजीएम विद्याअरण्यम हे नैसर्गिक, शांत परिसरात वसलेले पारंपरिक शैक्षणिक केंद्र असून शिबिरासाठी आदर्श स्थळ आहे.

# सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत ९६ उमेदवारी अर्ज;-सोमवारी छाननी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ मे : तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकी साठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी शुक्रवारी (दि.३०) सहा मतदार संघात एकूण ९६ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून सोमवारी (दि.०२ जून) या उमेदवारी अर्जाची छाननी होणार आहे दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी सर्वच राजकिय पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी गर्दी केली होती

तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक सोयगावात राजकिय पक्षांनी प्रतिष्ठेची केली आहे त्यामुळे १७ जागांसाठी ९६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे दरम्यान सोयगाव, बनोटी आणि फर्दापूर या तीन गटात ही निवडणूक होत आहे त्यासाठी सोयगाव गटात वैयक्तिक मतदार संघात १९ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून बनोटी गटात वैयक्तिक मतदार संघासाठी २१ तर फर्दापूर गटात १३ असे एकूण वैयक्तिक मतदार संघात नऊ जागांसाठी तब्बल ५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत सहकारी संस्था मतदार संघात सोयगाव गटातून सहा बनोटी गटातून ४ व फर्दापूर गटात दोन असे १२ उमेदवारी अर्ज दाखल आहेत महिला राखीव मधून तिन्ही गटात ९ अनुसूचित जाती जमाती मतदार संघात ४ इतर मागासवर्गीय मतदार संघात सहा व विमुक्त भटक्या जाती मतदार संघात तिन्ही गटात दहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत असे एकूण ९६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहे सोमवारी सकाळी अकरा वाजता छाननी होऊन अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी संजय गाजुलवाड यांनी सांगितले.

# समस्येच्या टाहो प्रश्नी शासकीय बैठकीसाठी सरसावले लोळगे



तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ : पैठण नगरपरिषद येथील विविध समस्यांचे शासन स्तरावर बैठक बोलवण्याबाबत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना नगराध्यक्ष सूरज लोळगे व भारतीय जनता पार्टी मधील पदाधिकारी यांनी निवेदन देऊन मागणी केली आहे.याबाबत पुढील आठवड्यात नगर विकास विभागाचा राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांचे मंत्रालयातील शासकीय दालनात बैठक बोलावण्यात आली आहे.

पैठण शहरातील स्वच्छता समस्या ,अपूर्ण पाणीपुरवठा योजना ,वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे, प्रधानमंत्री आवास योजना, शहरातील अपूर्ण विविध विकास कामे, अपूर्ण मलनिससारन योजना अशा विविध विभागाचा कार्यान्वयीन यंत्रणेची निगडित असलेले अनेक विषय निवेदनामध्ये नमूद करण्यात आले.

पैठण शहरातील विविध समस्या संदर्भात नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांना फोनवर संपर्क साधून माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना केलेल्या निवेदणावरून पैठण शहरातील विविध असल्याचे अवगत करून दिले व याबाबतीत योग्य तो तोडगा काढावा अशी सूचना केली यावर पुढील आठवड्यात नगर विकास राज्यमंत्री यांनी पुढील आठवड्यामध्ये या सर्व विषयांवर संबंधित अधिकारी यांची तात्काळ मुंबई येथील मंत्रालय मध्ये बैठक लावण्यात येईल व सर्व विषयांवर तोडगा काढण्यात येईल असे आश्वासित करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी दिली.

# जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त दुचाकी रॅलीतून जनजागृती

## मेडीकव्हर हॉस्पिटल आणि जिल्हा रुग्णालय यांचा संयुक्त उपक्रम



छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त मेडीकव्हर हॉस्पिटल आणि जिल्हा रुणालय यांच्या संयुक्त उपक्रम दुचाकी रॅलीतून जनजागृती करण्यात आली. जिल्हा रुणालय आणि मेडीकव्हर हॉस्पिटल यांच्या संयुक्त उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले. सकाळी ७ वाजता मेडीकव्हर हॉस्पिटल, सेव्हनहिल, क्रांतीचौक ते परत मेडीकव्हर हॉस्पिटल या मार्गावर ही जनजागृती केली गेली.

यावेळी विविध मान्यवर उपस्थित राहून रॅलीत सहभागी झाले. जागतिक आरोग्य संघटनेद्वारे तंबाखूविरोधी दिवस दरवर्षी ३१ मे रोजी पाळला जातो. यानिमित्त तंबाखूविरोधात जनजागृतीसाठी जिल्हा तंबाखू नियंत्रण बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास माहिती जिल्हा शल्यचिकित्सक तथा जिल्हा तंबाखू नियंत्रण समिती व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे सचिव, सिविल सर्जन, डॉ. दयानंद मोतीपवळे, मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्रप्रमुख दीपेन शाह आदीचे मार्गदर्शन लाभले. डॉक्टर अभय धानोरकर , जिल्हा स्वास्थ अधिकारी , डॉक्टर महेश लड्डा , मेडिकल ऑफिसर , यावेळी हे उपस्थित होते. मेडीकव्हरहॉस्पिटल्स तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या कर्करोगाचा सामना करण्यासाठी तयार आहे.

# वेरुळ येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० वी जयंती उत्साहात साजरी



खुलताबाद प्रतिनिधी / संतोष करपे : श्री क्षेत्र वेरूळ येथील शिवतीर्थ कुंडावर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० वी जयंती गंगापूर खुलताबाद आ प्रशांत बंब, आ संजय केनेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली दरम्यान मान्यवरांचे हस्ते महाआरती करण्यात आली.

शनिवार दि. ३१ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त आ प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली खुलताबाद तालुका भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने मान्यवरांचे हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व तदनंतर महाआरती करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी केले भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, घृष्णेश्वर देवस्थान समिती अध्यक्ष राजेंद्र कौशिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तर आ संजय केनेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. या वेळी बोलताना ते म्हणाले की, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यात आला त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला सतीची प्रथा बंद करण्यात आली, अनेक मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनी केला आज शेतीचा जो ७/१२ आहे तो त्यांनी सुरू केलेला आहे.अशा प्रकारे त्यांच्या कार्याचा गौरव, विधान परिषद सदस्य केनेकर यांनी त्यांच्या भाषणात केला.

या वेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, भाजपा गंगापूर तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सुरेश शिंदे,, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे, जिल्हा परिषद माजी सभापती भीमराव खंडागळे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, माजी नगरसेवक योगेश बारगळ, सतिश दांडेकर, , स्वीय सहाय्यक गोपाल वर्मा, , विजय राठोड ,सुखदेव ठेंगडे, सागर मातकर, विलास काळे, रावसाहेब देशमुख, ,राजेंद्र बढे, अरुण पाटे, अनिल करपे, अमोल गवळी, यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते

## मराठवाडा विभागातून प्रथम आलेले अभियंता राजेंद्र बोरकर यांचा सा.बां. मंत्री यांच्याहस्ते सम्मान




पैठण दि ३० :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाने शासकीय कार्यालयात शंभर दिवशीय कार्यालयीन कामकाज सुधारणा कार्यक्रम हे विशेष अभियान राबविले, त्यात औरंगाबाद विभागातून सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक तीन पाचोड हे तालुकास्तरीय कार्यालय मराठवाडा विभागातून प्रथम आल्याने पाचोड उपविभागाचे अभियंता राजेंद्र बोरकर यांचा आज मंत्रालयात पार पडलेल्या सत्कार समारंभात साबां, मंत्री शिवेंद्रसिंह राजेभोसले यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

मंत्रालयातील सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यास या उपविभागाचे सहाय्यक अभियंता श्रेणी १ राजेंद्र बोरकर, शाखा अभियंता प्रमोद मोरे, योगीराज चव्हाण, वरिष्ठ लिपिक बाळासाहेब केदार, गणेश यादव, गणेश म्हस्के आदींची उपस्थीती होती.

या पुरस्कार वितरण सोहळा समारोप प्रसंगी बोलतांना बोरकर म्हणाले की शासकीय कार्यालयात लोकांची कामे जलद गतीने व्हावीत कार्यालय शिस्त लागावी जनता प्रशासन यामधील दुरी दूर व्हावी कामकाज पारदर्शी व्हावे नागरिकांच्या तक्रारीचा निपटारा जलद गतीने करण्यात आल्याने कार्यालय मराठवाड्यात तालुकास्तरावर प्रथम आले यासाठी उपविभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारींनी पुढाकार घेतल्याने हा विभागस्तरीय पुरस्कार पटकावण्यात आला.

## प्राध्यापिका विजया केकान (बडधे) सेवानिवृत्त



गंगापूर दि.३१:-गंगापूर शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या कनिष्ठ महाविद्यालयातील अर्थशास्त्र/ मराठी विषयाच्या प्राध्यापिका श्रीमती विजया कोंडीराम केकान (विजया अशोक बडधे) या नियत वयमानानुसार दिनांक ३१/५/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्या. सचिव सुशील कुमारजी मंत्री, राजेंद्र सरोवर,विद्यालयाच्या

प्राचार्या श्रीमती बेंद्रे संजीवनी यांनी त्यांचा विद्यालयासाठी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव करून कार्यमुक्ती प्रमाणपत्र देऊन कार्यमुक्त केले.

श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत पुण्यार्थ ट्रस्ट अहमदनगर संस्था अध्यक्ष मा. खासदार राजकुमारजी धूत, अक्षयजी धूत, सचिव सुशील कुमारजी मंत्री ,सदस्य श्रीमती तृप्ती मंत्री, सुकुमार मंत्री ,संतोष भालेराव, राजेंद्र सरोवर ,प्रवीण कुमार सोमानी, माजी अध्यक्ष रामकिसनजी धूत प्राचार्या श्रीमती संजीवनी बेंद्रे, , पर्यवेक्षिका श्रीमती शास्त्री विदुला ,प्राध्यापिका श्रीमती वाडगावकर माधवी, प्राध्यापिका श्रीमती जरांगे संगीता ,प्राध्यापिका श्रीमती मांडे अंजली, यांनी त्यांना सेवानिवृत्ती निमित्त व पुढील निरोगी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग : बा.वि., जा.क्र./न.पा./८५४/२०२५-२६ दिनांक : ३०/०५/२०२५

**ई-निविदा - कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना सन २०२५-२६**

**ई-निविदा**

मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली (दुरध्वनी क्र.०२४५६-२२१७२७ ई-मेल coud. hingoli@maharashtra.gov.i नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत हिंगोली शहरातील जलेश्वर तलावातील माती व मुरम काढुन सपाटीकरण करणे या कामाकरिता निविदा कंत्राटदारा कडुन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे ई-टेंडरींग पध्दतीने दिनांक ०७/०६/२०२५ वेळ दुपारी/ संध्या. ५.०० वाजे पर्यत एकुण (०१) कामाच्या एकत्रीत पणे निविदा मागवित आहेत. निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.in वर दि.३१/०५/२०२५ रोजी संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह सकाळी / दुपारी मिळेल. १२.०० वाजता पासून पहावयास

स्वाक्षरीत/- **नगर अभियंता** **हिंगोली नगर परिषद, हिंगोली**

स्वाक्षरीत/- **मुख्याधिकारी** **हिंगोली नगर परिषद, हिंगोली**

**जाहिर प्रगटन**

**(मौजे. बिडकीन, ता. पैठण, जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट क्र. ११, विद्या संस्कृती नगर मधील प्लॉट क्र. १०, मिळकत क्र. १०४१३ बाबत)**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकार पत्रानुसार तमाम जनतेस सदरील जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मोहिते वैजीनाथ दगडू, रा. बिडकीन, ता. पैठण, जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्या मालकी व ताब्यातील मौजे. बिडकीन, ता. पैठण, जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट क्र. ११. विद्या संस्कृती नगर मधील प्लॉट क्र. १०, मिळकत क्र. १०४१३ ज्याचे क्षेत्रफळ १५२४.०० चौ. फुट म्हणजेच १४१.५८ चौ. मी. अशी मिळकत विकत घेण्याचा करार केला असून ज्याची एकत्रित चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : रस्ता पश्चिमेस : मिळकत नं. ११
दक्षिणेस : मिळकत नं. ९ उत्तरेस : मिळकत नं. १०/बी

वरील नमुद चतुःसिमेच्च्या आतील मिळकत माझे पक्षकार यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा करार केलेला आहे. माझे पक्षकारास मोहिते वैजीनाथ दगडू यांनी अशी हमी दिली आहे की, सदरील मिळकत ही निर्जोखीम आणि निर्वीवाद आहे. तरी वरिल परिशिष्टातील नमुद मिळकतीशी कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, हितसंबंध अथवा आक्षेप, जसे की, दान, गहाण, बक्षिस, दावा, डिक्री, बँकेचे कर्जबोजा, चोळी-बांगडी, विक्री, वारसाहक्क, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, आक्षेप वा उजर असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह आपला आक्षेप, उजर लेखी स्वरुपात माझ्या खालील नमूद कार्यालयीन पत्यावर नोंदवावा व त्याची पोहच घ्यावी. मुदतीत कोणाचाही उजर, आक्षेप न आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व दोषमुक्त आहे, असे समजून माझे पक्षकार खरेदीखताचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदती नंतरचा उजर, आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहिर प्रगटन.
दिनांक : ३०/०५/२०२५

**जाहिर प्रगटन देणार**
**ॲड. शेख आसेफ बना पटेल**
**ऑफिस: ज्योती नगर, पार्ट १, शेकटा रोड, बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद, मो. नं. ९०२१२१०७१०**

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २०-०५-२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **बेबीबाई भागवत सोहनी** यांनी मोहल्ला **नारळीबाग** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **७६८** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : आत्माराम जोहरे** **पश्चिम : नंदू हजारी**
**दक्षिण : दत्तात्रय अस्वार** **उत्तर : दिनेश हजारी**

आकार : पूर्व पश्चिम **२५.६×१६ = ४०९.६** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## अग्रलेख...

# ममता बॅनर्जींच्या पापाचा घडा भरला

पश्चिम बंगाल हे भारतातील एक राज्य आहे. पण हे राज्य भारतात आहे, असे तेथील सद्य राजकीय परिस्थिती पाहून वाटत नाही. पश्चिम बंगाल हे पाकिस्तान वा बांगलादेशातील एक राज्य असल्याचे तेथील अराजकाच्या परिस्थितीवरून जाणवते. पश्चिम बंगालमधील या भीषण स्थितीसाठी त्या राज्यातील जनता जबाबदार नाही तर तेथील राज्यकर्ते म्हणजे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष तृणमूल काँग्रेस जबाबदार आहे, असे म्हटले तर ते चूक होणार नाही. ममता बॅनर्जी यांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी हिंदूंना डावलत बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांना डोक्यावर बसवले, त्याचे दुष्परिणामही आता दिसून येत आहे.

बॅनर्जींच्या नावात ममता असली तरी त्यांच्या एकूणच आचरणात आता ममता नाही, तर क्रूरता दिसू लागली आहे. त्यांची वागणूक ममताशून्य असल्याचे राज्यातील जनतेला वाटू लागले आहे. खरं म्हणजे राज्यकर्त्यांनी त्यातही मुख्यमंत्रिपदावर असलेल्या व्यक्तीने संवेदनशील असले पाहिजे. राज्यातील शोषित, पीडित, वंचित जनतेला त्यांचा आधार वाटायला पाहिजे. सरकारचा कारभार पारदर्शी, भ्रष्टाचारमुक्त आणि जनतेला उत्तरदायी असला पाहिजे. पण पश्चिम बंगालचे राजकारण पाहिले तर त्याठिकाणी यापैकी कशाचाही लवलेश नाही. मुख्यमंत्री पुरुष असो महिला की, त्याने जनतेला न्याय मिळवून दिला पाहिजे. सर्वसामान्य जनतेवर अत्याचार होत असेल तर त्यांच्या मदतीला धावून गेले पाहिजे. पुरुषांपेक्षा महिला जास्त संवेदनशील असतात, त्यांना लोकांचे, विशेषतः महिलांच्या वेदना आणि समस्या लवकर समजतात, असे मानले जाते. दुसऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पाहून महिला मुख्यमंत्र्याला जास्त वेदना होतात, असे आतापर्यंत समजले जात होते. पण ममता बॅनर्जी यांनी हे सारे संकेत पायदळी तुडवले, खोटे ठरवले. गेल्या जवळपास १३ वर्षांत राज्यात जे काही घडले वा अजूनही घडत आहे, ते पाहून पश्चिम बंगालमधील सर्वसामान्य माणूस तर हादरला आहे, पण देशाच्या अन्य भागांतील लोकही अस्वस्थ आणि चिंतित झाले आहेत. राजकारणाच्या नावाखाली तृणमूल काँग्रेसच्या गुंडांनी पश्चिम बंगालमध्ये अक्षरशः नंगानाच चालवला आहे. राज्यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. कायदा आणि सुव्यवस्था नावालाही उरली नाही. सर्वसामान्य जनतेचे विशेषतः राज्यातील महिलांचे जिणे हराम झाले आहे. महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या, बलात्काराच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे. मध्यंतरी राज्यातील एका महिला डॉक्टरवरील पाशवी बलात्काराच्या तसेच तिच्या निर्घृण हत्येच्या घटनेने पश्चिम बंगालमधील जनताच नव्हे तर साऱ्या देशातील जनता हादरली होती. धक्कादायक बाब म्हणजे राज्यात एक महिला मुख्यमंत्री असताना हे सारे होत आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांनी ममता बॅनर्जी अस्वस्थ होत नाही, महिलांवर अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी त्या गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. यामुळे राज्यात गुन्हेगारांना मोकळे रान मिळत आहे. ममता बॅनर्जी यांची वागणूक एका संवेदनशील महिला राजकारण्याला शोभणारी नाही. महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना ममता बॅनर्जी यांना दिसत कशा नाहीत, याचे आश्चर्य वाटते. राजकीय स्वार्थासाठी त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या डोळ्यावर पट्टी बांधून घेतली की काय, असे वाटायला लागले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पश्चिम बंगाल दौऱ्यात हिंसाचार, अराजकता आणि महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे हा राज्याला लागलेला कलंक आहे आणि हीच त्या राज्याची ओळख झाली असल्याचा घणाघाती हल्ला चढवला. मोदी यांचा हा आरोप राजकीय हेतूने प्रेरित म्हणता येणार नाही, तर राज्याची वस्तुस्थिती आहे. मालदा आणि मुर्शिदाबाद येथील दंगलीच्या घटनांनी सरकारचा नाकर्तेपणा समोर आला. मुस्लिम गुंड महिलांच्या घरांवर हल्ले चढवत होते आणि राज्यातील पोलिस हा सारा प्रकार पाहत होते, असा आरोप मोदी यांनी केला. या दोन्ही भागांतील दंगली तृणमूल काँग्रेसच्या गुंडांनी घडवून आणल्या. त्यामुळे त्या सरकारपुरस्कृत दंगली होत्या, तसे नसते तर दंगली करणाऱ्या गुंडांना पोलिसांनी रोखले असते, त्यांना पकडले असते. पण राज्यात पोलिसांनी अशी कोणतीही कारवाई केल्याचे दिसले नाही. शिक्षक भरती घोटाळ्याने तर ममता बॅनर्जी सरकारचे पूर्ण वस्त्रहरण सर्वोच्च न्यायालयाने केले. जनाची नाही मनाची लाज असेल तर ममता सरकारने एक क्षणही सत्तेवर राहू नये, अशी राज्यातील परिस्थिती आहे. पंतप्रधान मोदी यांच्या आरोपानंतर खरं म्हणजे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आत्मपरीक्षण करायला पाहिजे, आपले कुठे चुकते, काय चुकते, याचा आढावा घ्यायला पाहिजे. पण तसे न करता ममता बॅनर्जी पंतप्रधान मोदी यांनाच आव्हान देत आहेत, त्यांच्यावरच उलट आरोप करत आहे. हा उर्मटपणाचा आणि मुजोरीचा कळस म्हटला पाहिजे. असे करताना नैतिकता धाब्यावर बसवत संघराज्य भावनेला आपण तडा देत असल्याचे भानही त्यांना उरले नाही. राजकीय नेता आणि राजकीय पक्ष म्हणून ममता बॅनर्जी यांना राजकारण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. आपल्या प्रतिस्पर्धी राजकीय पक्षावर आणि त्यांच्या नेत्यांवर त्या आरोपही करू शकतात. पण असे करताना राजकीय संकेत न पाळता त्या सर्व मर्यादा ओलांडत आहेत, निर्लज्जपणाचा कळस गाठत आहे. राज्यातील डाव्या पक्षाची दीर्घकाळाची गुंडगिरी मोडून काढत ममता बॅनर्जी जवळपास १३ वर्षांपूर्वी सत्तेवर आल्या, पण आता तर गुंडगिरीत त्यांनी डाव्या पक्षांवरही मात केली असल्याचे दिसत आहे. राज्यातील तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची गुंडगिरी पाहून गुंडगिरी करणारे माकपचे नेते आणि कार्यकर्ते सज्जन होते, असे म्हणण्याची वेळ राज्यातील जनतेवर आली आहे. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणत राज्यातील जनता आता आपले डोके आपटून घेत आहे.

ममता बॅनर्जी यांची एकूणच गुंडागर्दीची भाषा आणि वागणूक पाहिली तर दस्युसुंदरी फुलनदेवीलाही लाज वाटू शकते. मुळात ममता बॅनर्जी अशा नव्हत्या, पण सत्तेच्या नशेने त्यांच्यात झालेला हा आमूलाग्र बदल सगळ्यांनाच धक्का देणारा म्हटला पाहिजे. राज्यातील जनतेने माकपची गुंडागर्दी मोडून काढली, त्यामुळे त्याच जनतेला ममता बॅनर्जी यांची गुंडागर्दी मोडून काढणे कठीण नाही. राज्यातील जनतेने दीर्घकाळ सत्तेत असलेल्या माकपच्या अनेक दिग्गज नेत्यांना त्यांची लायकी दाखवली, घरी बसवले. त्यामुळे येत्या निवडणुकीत याच जनतेने ममता बॅनर्जी यांना घरी बसवले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. विधानसभा निवडणुकीत झालेली चूक राज्यातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भाजपाला विजयी करत दुरुस्त केली आहे. कधीकाळी राज्यात भाजपाचे अस्तित्व नव्हते. मात्र गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाची ताकद वाढली आहे. माकप डोईजड झाल्यामुळे राज्यातील जनतेने ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला सलग तीनदा संधी दिली आहे. त्यामुळे आता भ्रष्टाचाराने बरबटलेल्या आणि गुंडागर्दीची कमाल मर्यादा गाठलेल्या तृणमूल काँग्रेसला हटवून भाजपाला संधी देणे राज्यातील जनतेला कठीण नाही. ममता बॅनर्जी या सुरुवातीला अशा नव्हत्या. पण गेल्या काही वर्षांत त्यांच्यात सकारात्मक नाही तर नकारात्मक बदल मोठ्या प्रमाणात झाला आहे. 'कोण होतास तू काय झालास तू', या धर्तीवर 'कोण होतीस तू काय झालीस तू' असे ममता बॅनर्जी यांचे आजचे रूप पाहून म्हणावेसे वाटते. रावणांचा अहंकार आणि उन्मत्तपणा साध्या वानरांनी भगवान प्रभू रामचंद्राच्या आशीवार्दाने उतरवला होता. रावणाची लंका जाळून टाकली होती. आता भाजपाचे सामान्य कार्यकर्तेही आगामी विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांची सत्तेची लंकाही अशीच जाळून टाकतील, यात शंका नाही. राज्यातील जनतेने ममता बॅनर्जी यांना डोक्यावर बसवले होते, तीच जनता आता त्यांना पायदळी तुडवल्याशिवाय राहणार नाही. कारण ममता बॅनर्जी यांच्या पापाचा घडा भरला आहे. ▮

## यंगिस्तान

# पद्मश्री अशोक सराफ आणि वेव्हज् २०२५

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

मराठी चित्रपटसृष्टीला अभिमान वाटावा असा मोठा प्रसंग घडला आहे. महाराष्ट्राचे लाडके अभिनेते अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ५ दशकांहून अधिक काळ त्यांनी कलाक्षेत्रात दिलेल्या योगदानाचा हा सन्मान आहे. अशोक सराफ हे जरी मराठीत हिरो असले तरी आपण कॅरेक्टर आर्टिस्ट आहोत असं ते प्रांजळपणे मान्य करतात. मराठीसोबत हिंदी चित्रपटांतही त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या. 'हम पांच' या विनोदी मालिकेमुळे ते हिंदी रसिकांच्या घराघरात पोहोचले. एक मराठी माणूस म्हणून आपल्याला अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. भारतातील चित्रपटसृष्टीचा पाया मराठी माणसाने रचला होता. हिंदी किंवा बॉलिवूड चित्रपटसृष्टी महाराष्ट्रात म्हणजे मुंबईत आहे. महाराष्ट्र दिन १ मे रोजी आणखी एक महत्त्वाची घटना घडली आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अ‍ॅण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES २०२५) चे उद्घाटन केले. ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, कल्पना आणि सर्जनशीलतेचा विकास करणे, भारताला जागतिक स्तरावर कंटेंट निर्मिती, इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी (आयपी) डेव्हलपमेंट आणि मीडिया इनोव्हेशनचे हब म्हणून स्थापित करणे, जगभरातील मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील व्यावसायिक, निर्माते आणि प्रतिनिधींमध्ये सहकार्य आणि भागीदारीला प्रोत्साहन देणे व कंटेंट क्रिएटर्स, निर्माते, तंत्रज्ञ आणि इतर स्टेकहोल्डर्सना एक व्यासपीठ देऊन मनोरंजन आणि ऑडिओ-व्हिज्युअल उद्योगाची वाढ आणि विकास करणे तसेच ९० हून अधिक देशांचा सहभाग घडवून जागतिक दृष्टिकोनातून ज्ञान, कौशल्य आणि संसाधनांचे आदान-प्रदान करणे हा या समिटचा उद्देश होता. हे समिट महाराष्ट्रात संपन्न झाले. आता इथे प्रश्न उपस्थित राहतो की मराठी सिनेसृष्टीचा यामध्ये सहभाग कसा आहे आणि अशोक सराफ यांना पद्मश्री व वेव्हज् २०२५ या दोन महत्त्वाच्या घटना समोर ठेवल्या तर मराठी सिनेमाचे भवितव्य काय आहे?

मराठी सिनेमाला अभिजात परंपरा लाभलेली आहे. पण आता या घडीला मराठीमधले चांगले पटकथालेखक, संवादलेखक कोण हा प्रश्न विचारला तर आपल्याकडे उत्तर काय असणार आहे? आपल्याला ५ नावेही सांगता येणार नाहीत, हे दुर्दैव आहे. आपल्याकडे सबकुछ ही परंपरा निर्माण झाली आहे. म्हणजे जो दिग्दर्शक असतो तोच कथालेखक, तोच पटकथालेखक आणि तोच संवादलेखक असतो. यात वाईट असे काही नाही. परंतु या सबकुछ प्रथेमुळे जागतिक सोडा परंतु भारतीय सिनेसृष्टीवर प्रभाव पाडेल असा लेखक निर्माण होऊ शकला नाही, असा एक विशिष्ट दिग्दर्शक निर्माण होऊ शकला नाही. असा दिग्दर्शक ज्याचे चित्रपट पाहून एक विशिष्ट शैली दिसून येईल. इतकंच काय तर आपण एक चांगला हिरो देखील देऊ शकलेलो नाही. आज दक्षिण भारतीय सिनेमा हिंदी सिनेमाला मागे टाकत आहेत. अर्थात दक्षिण भारत आणि सिनेमांचा भावनिक संबंध आहे. तिकडचे हिरो हे त्यांचे देव असतात. तिथे मोठमोठे फॅन क्लब्स चालवले जातात. या झगमगाटापासून मराठी सिनेसृष्टी खूपच मागे आहे. हे जेव्हा घडेल तेव्हा घडेल, परंतु आता आपल्याला चांगले कंटेंट्स निर्माण करावे लागणार आहेत. मला कांतारा या सिनेमाचं कौतुक वाटतं. आपण स्वतःला पुरोगामी महाराष्ट्र म्हणवून घेत कॉलर उडवतो, असा विषय घेऊन, त्यास अंधश्रद्धा न म्हणून लोकभावनांचा आदर करून एक चांगला चित्रपट निर्माण केला. ऋषभ शेट्टी यांचे काही सिनेमे मी पाहिले होते. त्यात ''गरुड गमना ऋषभा वाहना'' हा क्राईम थ्रिलर मला खूप आवडला होता. आपल्या संस्कृतीला अंधश्रद्धा म्हणत, नाकारत, उगाच पुरोगामित्वाचा आव आणत आपल्याला कंटेंट्स निर्माण करता येणार नाही. उलट अनेक दक्षिण भारतीय सिनेमांच्या यशाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांनी त्यांच्या संस्कृतीतले चित्रपट दिले. त्यांची संस्कृती त्यांनी ग्लोबल पद्धतीने सादर केली. आपल्याकडे नागराज मंजुळे यांचा 'सैराट' हा चित्रपट का चालला हे आपण जाणून घेऊ शकत नाही. एकतर तो मातीतला सिनेमा होता, गावरान संस्कृतीचं दर्शन त्यातून घडलं आणि सर्वांत जमेची बाजू म्हणजे अनेक वर्षांनंतर आलेला हा एकमेव प्युअर रोमँटिक सिनेमा होता. इतक्या वर्षांत आपल्याकडे विनोदी सिनेमा निर्माण झाले आणि त्यात रोमान्स शिंपडण्यात आला होता. परंतु सैराट हा रोमँटिक सिनेमा होता, ज्यात विनोदही होता. सैराटची कॉपी करणारे अनेक सिनेमे नंतर आले आणि गेले हे कुणालाच कळलं नाही. मी सीबीएफसी (फिल्म सेन्सॉर बोर्ड) येथे अनेक वर्षे सलागार सदस्य म्हणून काम करत होतो. जवळजवळ ५५०-६०० चित्रपटांचं सर्टिफिकेशन केलं असेल (सामान्यांच्या भाषेत सेन्सॉर केलं). म्हणून मला ही गोष्ट माहीत आहे.

वर्षभरात निर्माण होणाऱ्या सिनेमांपैकी सुमारे १०-२० टक्के सिनेमे बॉक्स ऑफिसवर यशस्वी होतात आणि कमी बजेट असूनही ६०-७० टक्के सिनेमांना आपल्या बजेटची वसुलीही करता येत नाही असं काही तज्ज्ञांचं मत आहे. प्रेक्षकांचा अभाव, मार्केटिंगचा अभाव आणि अपुरे स्क्रीन्स हे घटक यास कारणीभूत असतील परंतु आपण इतर भाषेच्या चित्रपटांकडे नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की अनेक वर्षांत आपण दमदार कंटेंट्स निर्माण केलेले नाहीत. 'रेगे'सारखा उत्तम क्राईम सिनेमा आपण निर्माण केला आहे. 'वाळवी' या चित्रपटात विनोद, क्राईम आणि थ्रिल यांची चांगली सांगड घालण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र आपण क्राईम, थ्रिलर या वाटेला फारसे गेलो नाही. मराठी प्रेक्षकांना शिवकालीन चित्रपट आवडतातच मात्र कुठल्याही प्रेक्षकांना रोमँटिक आणि क्राईम थ्रिलर बघायला आवडतात. आता तर ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे अनेक जॉनर घरबसल्या बघायला मिळतात. जागतिक सिनेमे आपण एका टॅपवर पाहू शकतो. मग इतकी स्पर्धा असताना आपण चित्रपटांच्या बाबतीत गांभीर्याने विचार करायला हवा. इंग्रजी माध्यमातून शिकण्याचं फॅड वाढल्यामुळे तरुण मुलं मराठीपासून दूर जातात की काय अशी भीती आपल्याला वाटू लागली आहे. आपल्याला स्क्रीन्स मिळत नाहीत म्हणून आपण रडत बसतो. कुणीतरी मराठीच्या नावाने बोंबा मारणाऱ्या नेत्याची दारे आपण झिजवतो. त्यांना आयताच मुद्दा मिळतो. अर्थात मराठीवरील अन्याय हा खोटा प्रचार नाही. मात्र आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की तुमच्या कलाकृतींतून लोकांना पैसा मिळायला लागला तर स्क्रीन्स मिळणारच. हा पैशांचा खेळ आहे. प्रेक्षक येत नाहीत ही देखील समस्या आहेच. मी bear grylls ची एक सीरिज मराठीत लिहीत होतो. पण ती मध्येच थांबवावी लागली. कारण मराठी प्रेक्षक मराठी अनुवादित सीरिज, चित्रपट पाहत नाहीत. ते हिंदी अनुवाद पाहणे पसंत करतात. उलट अनेक इंग्रजी चित्रपट दक्षिण भारतीय भाषांमध्ये डब होतात आणि चांगला गल्ला कमावतात. त्यासाठी चांगले, दर्जेदार कंटेट क्रिएट करणं हे मुख्य पाऊल आहे. पटकथा, संवाद लेखक म्हणून किमान १०-१५ चांगल्या लेखकांची नावे सहज सांगता येतील अशी परिस्थिती निर्माण करावी लागणार आहे. प्रत्येक विषयातला एक तज्ज्ञ असतो, तसे तज्ज्ञ निर्माण करणे आणि त्या तज्ज्ञांनी ते काम करणे अपेक्षित आहे, मग तो नवोदित असला तरी चालेल. ''काहीतरी हॅपनिंग हवं'' असं म्हणत वाह्यात पटकथा लिहून चालणार नाही. चित्रपटाची कथा, कथेचा आवाका आणि जॉनर लक्षात ठेवून पटकथा निर्माण करावी लागेल. मराठी प्रायोगिक नाटके, एकांकिका पाहिली तरी किती नवनवीन प्रयोग तिथे होत असताना आपल्याला दिसतील. टॅलेंटची कमतरता नाही, पण टॅलेंट ओळखणाऱ्यांची मात्र कमतरता आहे. नटश्रेष्ठ अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे, वेव्हज् २०२५ महाराष्ट्रात संपन्न झाले आहे. या पृष्ठभूमीवर आपण कलाकार आणि प्रेक्षकांनी मिळून मराठी सिनेसृष्टीला उभारी देण्याची शपथ घेऊन जोमाने काम करायला हवे. अशोक सराफ यांचे मन:पूर्वक अभिनंदन. मराठी माणसाला आपला अभिमान आहे! ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# करूया जल पुनर्भरणाचा संकल्प

मान्सूनपूर्व पावसाने राज्यात मे महिन्यातील सुमारे १०० वर्षांचा विक्रम मोडला. मुंबई-पुणेसह सर्वत्र या पावसाने दाणादाण उडविली. त्यातच मान्सून पोहोचल्याची सुवार्ता मिळाली. महाराष्ट्रात सरासरी १,१३१ मिमी पाऊस पडतो. विभागनिहाय विचार केल्यास सर्वाधिक पाऊस कोकणात सरासरी ३,००० मिमी, तर सर्वांत कमी ८८२ मिमी पाऊस मराठवाड्यात पडतो. विदर्भात सरासरी १,०३४ मिमी, तर मध्य महाराष्ट्रात सरासरी ९०१ मिमी पावसाची नोंद होते. काही ठिकाणी अधिक तर काही ठिकाणी कमी असे पावसाचे प्रमाण असले, तरी निसर्गाने दिलेले दान जसे बरसते तसेच वाहून जाते. हे दान साठवून ठेवण्याची सवय नसल्याचे दुष्परिणाम दरवर्षी दिसतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील अनेक ठिकाणी मुख्यतः विदर्भ, मराठवाड्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. या दिवसात ग्रामीण भागातील मायमाउलीची डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन काही किलोमीटरची पायपीट नित्याचीच. दिवसेंदिवस पाण्याचे दुर्भिक्ष वाढते आहे. या समस्येवर साधा-सोपा उपाय म्हणजे जल पुनर्भरण होय. पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाची उपयोगिता लक्षात घेऊन त्याचे योग्य नियोजन करणे.

पाणी हे जीवन आहे. सजीव सृष्टीसाठी तर पाण्याचे महत्त्व निर्विवादच. पण गत काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेले औद्योगीकरण, शहरीकरणामुळे भूगर्भ जलसाठ्याचा होत असलेला उपसा भूजल पातळी खालविण्याचे प्रमुख कारण म्हणावे लागेल. एकीकडे झपाट्याने होत असलेला पाण्याचा उपसा तर दुसरीकडे जंगलातील वृक्षांची कत्तल त्यातच शहरीकरणामुळे उभे राहणाऱ्या सिमेंटच्या जंगलांनी नैसर्गिक जल पुनर्भरणाचे स्रोत बाधित झाले आहेत. या पृष्ठभूमीवर पावसाच्या प्रत्येक थेंबाद्वारे जल पुनर्भरण हा एकमेव उपाय आहे. यासाठी समाजातील प्रत्येक सुजाण नागरिकाचा कृतियुक्त सहभाग निश्चितच महत्त्वाचा ठरेल. वास्तविक जल पुनर्भरण ही एक पर्यावरणपूरक, कमी खर्चाची आणि दीर्घकालीन फायदा देणारी उपाययोजना आहे. घरांच्या छतावरील पाणी जमिनीत सोडणे, वाहून जाणाऱ्या पाण्यासाठी शोष विहीर तयार करणे, डोंगराळ भागासह शेतजमिनीतील पाणी जमिनीत मुरविण्यासाठी प्रयत्न करणे तर पाण्याचे नैसर्गिक साठ्यामधील गाळ काढून पावसाचे पाणी या साठ्यांपर्यंच पोहोचविणे अशा विविध उपाययोजनांचा यात समावेश करता येईल. पण मुख्यतः याची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करीत आपल्या घराच्या छतावरील पाणी थेट जमिनीत मुरविण्याकरिता पुढाकार घेऊन करता येईल का? विविध सामाजिक, राजकीय संघटना, संस्था शहर आणि शहरालगत असलेल्या मोकळ्या जागांचा अभ्यास करून वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण व्हावे याकरिता प्रयत्न करतील का? या प्रश्नांची सकारात्मक उत्तरे भविष्यातील पाणीटंचाई सोडविणारी ठरतील. देवेंद्र फडणवीस यांनी वेळीच ही बाब ओळखून २०१४ साली ते मुख्यमंत्री झाल्यानंतर जलयुक्त शिवार योजना राबविली. राज्यातील पाण्याची टंचाई सर्वार्थाने दूर करणे हा त्याचा हेतू होता. दुर्दैवाने मध्यंतरीच्या राजकीय घडामोडीत ही योजना बाजूला पडली असली, तरी महायुतीचे सरकार आल्यानंतर २०२२ पासून या योजनेला पुन्हा सुरुवात झाली आहे. शासनस्तरावर याबाबत प्रयत्न होत असतानाच जोपर्यंत जल पुनर्भरण ही लोकचळवळ होणार नाही तोपर्यंत समस्येचे मुळापासून निराकरण कसे करता येईल? म्हणूनच जल पुनर्भरण केवळ जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून चालणारा शासकीय उपक्रम न ठरता महानगर, शहर, तालुक्यापासून गावखेड्यात राहणाऱ्या प्रत्येकाचा सहभाग असणारा उपक्रम व्हावा.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात असणारे बारीपाडा हे १९९२-९३ पर्यंत पाण्याची भीषण समस्या असलेले गाव. आता मात्र या गावात सिंचन होऊ शकेल इतके मुबलक पाणी आहे. मध्यंतरीच्या कालावधीत या गावातील गावकऱ्यांनी तब्बल ४८२ दगडी बांध, ७० मातीचे बांध श्रमदानातून बांधले. त्यातून स्वाभाविकच जलपुनर्भरण होऊन तेथील पाण्याची समस्या दूर झाली. आता या गावात ४२ विहिरींमध्ये तुडुंब पाणी आहे. केवळ बारीपाडाच नव्हे तर आजूबाजूच्या तीन पाड्यांना पिण्याचे पाणी येथून पुरविले जाते. जल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धनाचा हा आदर्श गावकऱ्यांसह निर्माण केला आहे तो चैतराम पवार यांनी. म्हणूनच केंद्र शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्काराने नुकतेच सन्मानित केले. जल पुनर्भरणाचा आदर्श आपल्यासमोर ठेवणाऱ्या चैतराम पवार यांच्या अनुकरणाचा संकल्प या पावसाळ्यापूर्वी प्रत्येकाने करावा. ▮

९४२२८६२४८४


## मुंबई वार्तापत्र

# विरोधक कुठाय्?

**नागेश दाचेवार**

संधिसाधू सत्तालोलुपतेतून केलेल्या महाविकास आघाडीतील घटक पक्ष अर्थात सध्याचे विरोधी पक्ष नेमके आहेत तरी कुठे, असा प्रश्न यावेळी उपस्थित होणे अपेक्षितच आहे. लोकसभेत मिळालेल्या यशानंतर महाविकास आघाडीतील नेते एकदम हवेत होते. विधानसभेत सपाटून मार खाल्ल्यानंतर यांची पुरती दाणादाण उडाली आहे. लोकसभा, विधानसभेनंतर राज्यातली सर्वांत मोठी निवडणूक ही मुंबई महापालिकेची असते. महापालिकेची निवडणूक तोंडावर येऊन ठेपली असताना युद्धाआधीच विरोधक शस्त्र टाकलेल्या पराभूत मानसिकतेत दिसू लागले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने पुढील चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचा निर्देश दिल्यामुळे आता अलिकडील काळात निवडणुका होणे निश्चित आहे. निवडणुका म्हटलं की, सर्वच राजकीय पक्षांचा उत्साह वाढतो. त्याप्रमाणे केंद्रात आणि राज्यातील सत्ता काबीज केल्यानंतर देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर अधिराज्य गाजविण्यासाठी भारतीय जनता पक्षाने कंबर कसली आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची कामगिरी मुंबईत चांगली राहिली. त्याचवेळी अवघ्या सहा महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत अत्यंत निराशाजनक कामगिरी राहिली आणि दुसरीकडे महायुतीची कामगिरी दमदार होती. महायुतीने महाराष्ट्रात जोरदार कमबॅक करताना मुंबईदेखील राखली. आता यावेळी महायुती संघटित दिसत आहे. भाजपा तर एका बाजूने जोरदार बॅटिंग करणारच आहे आणि दुसऱ्या बाजूने शिवसेना फटकेबाजी करायला उत्सुक दिसत आहे. विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात चांगलं प्रदर्शन शिवसेनेने केलं. यात राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईत फार अशी जमीन नसली, तरी अजित पवार मुंबई काबीज करण्याच्या महायुतीच्या संकल्पात ताकदीने उतरलेले दिसत आहेत. एकूणच काय, तर महायुती एकदम भक्कम दिसत आहे. भक्कम असूनही महायुतीचे नेते कार्यकर्ते ग्राऊंड वर्क करताना, श्रम घेताना, मतदारसंघांची बांधणी करताना दिसत आहेत.



त्याचवेळी महाविकास आघाडीची पुरती धूळधाण उडाली असल्याचे चित्र दिसत आहे. 'एकाचा पायपोस एकाला नाही.' काळूबाळूची वगनाट्ये महाविकास आघाडीत चालल्याचे दिसत आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे तर आधीच दोन फड झालेत. काँग्रेस तेवढी यातून बचावली होती. मात्र, आता अलिकडल्या काळातले चित्र बघितल्यास प्रदेशाध्यक्ष पद द्यायला पक्षाकडे माणूस नाही; किंबहुना हे पद स्वीकारायला पक्षातला कोणताच नेता तयार नाही. विजय वडेट्टीवारांची वक्तव्ये तर वगनाट्यातील, मनोरंजनासाठी केलेली वाटतात. एकूणच काँग्रेसदेखील तमाशाचा फड झालेली दिसत आहे. राज्यातील जनता यांची ही सगळी नाटकं मनोरंजन म्हणून बघत आहेत. काँग्रेसमधील तमाशा बघितल्यास ती फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचे चित्र दिसते. जनतेने विधानसभेत दिलेल्या धक्क्यातून अजून तिन्ही पक्ष सावरलेले दिसत नाहीत. यांच्यातील आपसी मतभेदांमुळे सरकारवर पाहिजे तसा वचक हे तीनही पक्ष विरोधी पक्ष म्हणून बसवू शकलेले नाहीत. विरोधी पक्षाने ज्या ताकदीने सरकारवर तुटून पडायला पाहिजे ती ताकद किंवा मानसिकता सध्याच्या विरोधी पक्षात दिसून येत नाही. हे सगळं म्हणजे विरोधकांच्या हताश आणि खचलेल्या मानसिकतेचं प्रतीक आहे. येथे विरोधकांना लक्ष्य करायचे सोडून उद्धव ठाकरेंचे सेनापती काँग्रेसवर टीका करताना दिसतात. उबाठाचे नाशिक महानगराचे नेते बाळा दराडे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल अपशब्द सहन करणार नाही. राहुल गांधींच्या तोंडाला काळे फासू... तसेच काळे फासता आले नाही तर दगडफेक करू, अशी धमकीच दिली आहे. आघाडी बिघाडी गेली खड्ड्यात, अशा शब्दात काँग्रेसवर हल्ला चढवला. अलिकडे तर संजय राऊत आपले गॉडफॉदर शरद पवारांवरदेखील तोंडसुख घेताना दिसत आहेत. त्यामुळे महापालिका निवडणुकीत जर उद्धव ठाकरे गटाने लोकसभा आणि विधानसभेप्रमाणे ताणाताणी केलीच तर कदाचित काँग्रेसही ताणल्याशिवाय सोडणार नाही. त्याचा अनुभव विधानसभेत आलाच आहे. त्यात जर शरद पवारांना समाधानकारक जागा मिळाल्या नाहीत तर त्यांचाही आघाडी करण्यात फार रस असेल, असे दिसत नाही. त्यामुळे येऊ घातलेली मुंबई महापालिकेची निवडणूक हे तिघे एकत्र लढतील याबाबत साशंकताच आहे. अशा या विरोधकांच्या निराश मानसिकतेतून बलाढ्य अशा भारतीय जनता पक्षाचा हे सामना कसा करतील? आता तर यांच्या नेहमीच्या अर्थात सरकारी यंत्रणा वापरणे, पोलिसी बळाचा वापर करणे, अर्थकारण यासारख्या विविध पारंपरिक टॅक्टिज यावेळी चालणार नाहीत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सज्ज अशी महायुती आणि दुसरीकडे युद्धाआधीच शस्त्रे टाकलेली महाआघाडी अशी परिस्थिती आज दिसत आहे. सत्तेविना तडफडू लागलेले यांचे नेते आणि कार्यकर्ते साथ सोडण्याच्या तयारीत दिसत आहेत. उद्धव सेनेच्या लोकांची एकनाथ शिंदेंकडे रीघ लागली आहे. तर, भाजपात अलिकडले पक्षप्रवेश बघितल्यास निव्वळ इनकमिंग आणि इनकमिंगच दिसत आहे. दोन राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोमिलन झाले नाही तर, शरद पवार गटालाही गळती लागण्याची पूर्ण शक्यता आहे. दस्तुरखुद्द जयंत पाटलांचंच तळ्यात-मळ्यात चाललं आहे. अशा या अत्यंत बिथरलेल्या परिस्थितीत केवळ अधूनमधून काहीतरी पुड्या सोडून हवा भरण्याचा, स्वतःचं समाधान करून घेण्याचा प्रयत्न केला जात असतो. मग त्यांना राज-उद्धव मनोमिलनातून आशेचा किरण दिसू लागतो. उबाठा-मनसे एकत्र लढेल तर मतांचं विभाजन टळेल आणि आघाडीची ताकद वाढेल. मग महायुतीला पराभूत करू शकू वगैरे वगैरे 'स्वप्नांचे इमले' बांधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ▮

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### 'तरुण भारत'ची वैचारिक मेजवानी

आजच्या समाज माध्यमाच्या युगात वर्तमानपत्र टिकून आहे याचे कारण वर्तमानपत्रात येणारी प्रत्येक बातमी, माहिती ही विश्वासू असते. शतकाच्या उंबरठ्यावर येऊन दै. तरुण भारताने हा वाचकांच्या मनात विश्वास कायम ठेवला आहे. तरुण भारत हे फक्त एक वर्तमानपत्र नाही तर तो एक विचार आहे. त्यामुळे तरुण भारत एक दिवस जरी वाचायला मिळाला नाही तर मन अस्वस्थ होते. काही वेळा तरुण भारतऐवजी दुसराच कोणता पेपर घरी टाकला तर लगेच फोन करून ''कसेही करून तरुण भारत आणून द्या अन् टाकलेला पेपर परत घेऊन जा'' असे सांगावे लागते.

माझा तरुण भारताशी फार लहानपणापासूनच संबंध आला आहे. माझा जन्म होण्याच्या अगोदरपासून आमच्या घरी तरुण भारत येत आहे. त्यामुळे दुसरा पेपर वाचायला मिळाला तरी तरुण भारत वाचल्याशिवाय चैन पडत नाही. मला लिहायची सवय लागली ती तरुण भारतने प्रोत्साहन दिले म्हणून. तरुण भारतचे दिग्गज संपादक मंडळी नानासाहेब ठेंगडी, मामासाहेब घुमरे, राजाभाऊ पोफळी हे मला लिहायला विषय देत असत अन् जे लिहिले त्यात काही दुरुस्ती करून ते मनोगत प्रकाशित करण्यात येत असल्याने मला प्रोत्साहन मिळत गेले. आज माझी लिखाणात जी काही प्रगती झाली त्याचे संपूर्ण श्रेय मी तरुण भारतला देतो. माझी दिवसाची सुरुवातच तरुण भारत वाचनाने होते. आज मी कुठेही असलो, अगदी नागपूरला नसलो तरी ऑनलाईन तरुण भारत वाचून मी माझी भूक भागवतो. आता तरुण भारत शंभराव्या वर्षात पदार्पण करत आहे याचा आम्हाला आनंद आहे. तरुण भारतात येणाऱ्या बातम्या या विश्वासार्ह तर असतातच विशेष म्हणजे संपादकीय, अग्रलेख, इतर लेख हे अतिशय उत्तम असतात. नवीन विचार देऊन जाणारे असतात. तरुण भारताच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी ग्रंथालय भारतीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४४७०५२

●● ●●

### भ्रष्टाचार प्रकरणात झारीतील शुक्राचार्यांवर कारवाई व्हावी

एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक विषयांवर संवाद साधताना शासन व्यवस्थेत भ्रष्टाचार करणाऱ्यांना तुरुंगात धाडण्यात येईल अशी तंबी दिल्याचे वाचण्यात आले. हे विधान अतिशय स्वागतार्ह आहे. केंद्रीय भ्रष्टाचार नियंत्रण विभाग असो की राज्य एसीबी विभाग, अमक्या तमक्याला लाच घेताना रंगेहात पकडले अशा बातम्या नित्य येत असतात. त्यावेळी भ्रष्टाचाराविषयी चीड असणाऱ्यांना बरे वाटते आणि भ्रष्टाचार खात्याविषयीचा विश्वास जागृत होतो. अर्थात कालांतराने अशी जुनी प्रकरणे जनता विसरते कारण रोज नवनवीन प्रकरणांची भर पडतच असते. याचे एकमेव कारण म्हणजे न्यायालयीन खटल्यांना होणारा विलंब.

खटला उभा राहण्यास सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी लवकर न मिळणे, आरोपीचे उच्च स्तरावर किंवा राजकीय पुढाऱ्यांशी असलेले साटेलोटे, न्यायालयात खटला उभा झाल्यास साक्षीदारांना फितवणे, आरोपीने मलाच या प्रकरणात कसे गोवले गेले आहे असा बनाव करणे, वगैरे अशी कारणे असू शकतात. अनेक सरकारी खात्यांमध्ये अशा कमाईचा वाटा व्यवस्थित वरपर्यंत जात असतो हे जनतेला ठावूक आहे. त्यामुळे भ्रष्टाचार प्रकरणात रंगेहात पकडलेली प्रकरणे भरपूर दिसत असली तरी प्रत्यक्षात किती आरोपींना शिक्षा झाली हे जनतेला कळत नाही. अनेक प्रकरणांत निलंबित आरोपी आपल्या नोकरीत पुन्हा रुजू होऊन राजरोसपणे वावरतो. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी न्यायिक प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासाठी काही उपाय करून यंत्रणेतील लाचखोरांना पाठीशी घालून प्रकरण कमकुवत करणाऱ्या झारीतील शुक्राचार्यांवरही ठोस कारवाई करावी.

**राम राजे**/९४२१७७९९४५

●● ●●

### योजना वाढल्या; रोजगार, नोकरीच्या संधी घटल्या

देशात, राज्यात विविध सरकारी योजना मोठ्या प्रमाणावर सुरू असतानाही प्रत्यक्षात रोजगार, नोकरीच्या संधी घटत असल्याच वास्तव समोर येत आहे. केंद्र व राज्य सरकारांच्या अनेक योजना घोषित होत आहेत. गरजू त्याचा लाभही घेत आहेत. पण बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे.

स्टार्टअप इंडिया, मुद्रा योजना, स्किल इंडिया, आत्मनिर्भर भारत रोजगार योजना अशा अनेक योजना सुरू असून त्यांच्या माध्यमातून व्यवसाय रोजगारनिर्मिती होणार असली तरी याचे परिणाम प्रत्यक्षात फारसे दिसून येत नाहीत. ग्रामीण भागात या योजनांची माहिती कमी असून, शहरांमध्येही लाभ मिळवण्यासाठी अनेक अडचणी येत असतात. त्या व्यतिरिक्त राज्यात दरवर्षी हजारो विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडतात. मात्र, त्यांच्या शिक्षणानुसार स्थिर व योग्य नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. इंजिनीअरिंग, व्यवस्थापन, विज्ञान आणि कला शाखांतील तरुण मोठ्या प्रमाणावर बेरोजगार असल्याचे आकडे वाढत चालले आहे सरकारी नोकरभरती गेल्या काही वर्षांपासून रखडली आहे. अनेक परीक्षा घेतल्या जात नाहीत, घेतल्या गेल्या तरी निकाल लांबणीवर टाकले जातात. काही जागा सरळ खाजगीकरणाच्या मार्गावर नेल्या जात असल्याने सरकारी नोकरीच्या संधीही कमी झाल्या आहेत. रोजगाराची संधी, नोकरी यावर सुद्धा तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे ▮

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बीड शहरातील उच्चभ्रू वस्ती इंडिया बँक कॉलनी येथे वेश्याव्यवसायावर छापा

## एक आंटी व एक दलाल अटकेत, परराज्यातील एका महिलेची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ मे**

दिनांक ३० मे २०२५ रोजी बीड शहरातील जालना रोडवरील इंडिया बँक कॉलनी येथे एका आपार्टमेंट मध्ये एक महिला व एक पुरुष परराज्यातील महिला आणून तिचे कडुन वेश्या व्यवसाय करून घेतात, अशी गोपनीय माहिती AHTU पथक प्रमुख API वर्षा व्हगाडे यांना मिळाली होती. त्यावरून सदर भागामधील राम अंश अपार्टमेंट मध्ये फ्लॅट-०२ मध्ये AHTU पथक बीड यांनी डमी ग्राहक व दोन पंचांसह सापळा रचून रेड केली असता, सदर ठिकाणी पश्चिम बंगाल येथील मुर्शिदाबाद, कोलकत्ता येथील एक पिडीत महिला हीचेकडून आँटी नामे १)शकुंतला सुरेश राऊत वय ४० वर्ष राहणार फ्लॅट क्रमांक ०२ राम अंश अपार्टमेंट इंडिया बँक कॉलनी बीड,ही २) दलाल महेश मोहनराव चांदणे, वय ३३, राहणार गया नगर बीड, याचे व ३) मुमताज नासिर शेख गेवराई हीचे मदतीने स्वतःचे भाड्याने घेतलेल्या फ्लॅटमध्ये वेश्या व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. सदर कामास मुमताज नसीर शेख, कामासाठी महिला पुरवत असे, व दलाल महेश चांदणे हा त्याचे रिक्षा क्रमांक MH 23 R 0509 यातून मुलींची ने आण करून शकुंतला राऊत हिच्याकडे महिला पुरवत असे.




याप्रकरणी या तिघांवरही अनैतिक मानवी प्रतिबंध कायदा कलम ०३,०४,०५,०६ या अन्वये व भारतीय न्याय संहिता कलम १४३ (२) अन्वये पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आँटी शकुंतला राऊत, व आरोपी महेश चांदणे यास अटक करण्यात आलेली आहे, सदर प्रकरणातील आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे दोन्ही आरोपी सराईत असून यापूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे २०२१ व २०२२ मध्ये पिटा कायद्यांतर्गत तसेच IPC ३२४,४२७,१३८ अन्वये गुन्हे दाखल आहेत.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात, AHTU पथक प्रमुख API वर्षा व्हगाडे, पुरुष अंमलदार ASI ७८३ संजय सुरवसे, पोह/२४२ अशोक शिंदे, पोह २१५७ प्रदीप येवले, महिला हवालदार १२७३ अनिता माने, पोह १३४७ मनीषा खरमाटे यांनी केली.

# मांजरा धरणाच्या पाणी साठ्यात ४.८४९ दलघमीने वाढ

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ मे**



यंदा झालेल्या दमदार मान्सूनपूर्व पावसाने नदी नाल्यांना भरती आल्याने मांजरा नदी दुधडी भरून वाहू लागल्याने १२ तासात धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरणात तब्बल ४.८४९ दलघमी इतका पाणी साठा वाढला आहे.

मागील १५ ते २० दिवसापासून अंबाजोगाई,केज, तालुक्यात सतत अवकाळी पाऊस पडत असल्याने सर्वत्र पाणी झाले असून धनेगाव येथील मांजरा धरण क्षेत्रात पडलेल्या पावसाने धरणात ६.१०० दलघमी इतका पाणी साठा वाढला होता. त्यात यंदा में महिन्यात झालेल्या मान्सूनपूर्व दमदार पावसाने नदी नाल्यांना भरती आल्याने उपनद्यांचे पाणी मांजरा नदीला मिळाल्याने आता मांजरा नदी दुधडी भरून वाहू लागली आहे.मागील १२ तासात मांजरा नदीच्या पाण्याची धरणात आवक झाल्याने तब्बल ४.८४९ दलघमी इतका पाणी साठा वाढला आहे. तर ३९६३ क्यूसेसने पाण्याची आवक सुरू असल्याची माहिती धरणाचे शाखाधिकारी सुरज निकम यांनी दिली.



**बीड : येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना पत्रकार संजय देवा कुलकर्णी, विश्वास तांदळे, श्रीकांत कुलकर्णी, सचिन कुलकर्णी (छाया-कृष्णा शिंदे)**

# खडतर काळात अहिल्यादेवींनी तीर्थ क्षेत्रांचा विकास केला-प्राचार्य मोराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ मे**



पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अतिशय प्रतिकूल आणि खडतर परिस्थितीमध्ये अहिल्यादेवी होळकर यांनी देशातील तीर्थस्थळांचा विकास केला. अनेक समाज उपयोगी कामे उभी केली असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले.सावरकर महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी या प्रसंगी डॉ. सुहास मोराळे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती होती अशा खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला अहिल्यादेवींच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे.अहिल्यादेवींनी केलेल्या सामाजिक सुधारणा समाजासाठी प्रेरणादायी आहेत. शेतकऱ्यांवर लादलेले अन्यायकारक कर त्यांनी रद्द केले. प्रशासनात महिलांना समान संधी दिली.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी अहिल्यादेवी होळकर त्रीजन्मशताब्दी निमित्त महाविद्यालयात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. यावेळी अधीक्षक डॉ. प्रशांत तालखेडकर, प्रा. संजय काळे,प्रा राम गव्हाणे,अभिजीत पांडव, विनोद देशपांडे, यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

# लढलो नाही तर पिढी वाया जाईल-पवार

## माजी मंत्री पंडित, तहसीलदार यांनी घेतली भेट




**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ मे**

वर्षानुवर्षे आपल्या शेतीला पाणी नाही, दुष्काळाने शेतकर्यांसमोर आर्थिक प्रश्न आहेत, आताही आपण शेती पाण्यासाठी लढलो नाही तर पुढील पिढ्याही दारीद्र्यात जातील, त्यामुळे आता शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी मोठा लढा दिला पाहिजे, असे प्रतिपादन बाळराजे पवार यांनी तांदळा येथे केले. शुक्रवारी त्यांनी तांदळा येथे भेट देत उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, तहसीलदार संदिप खोमाने यांनीही भेट दिली.

जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या या दुसर्या टप्प्यात तांदळा येथे अजय पाटील साळुंके यांनी २५ मे पासून उपोषण सुरू केले आहे. गेल्या सहा दिवसात त्यांनी अन्नपाणी त्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. अशक्तपणा येऊन किडनीलाही त्रास होत आहे. त्यांच्या या प्रकृतीची माहिती मिळताच शुक्रवारी बाळराजे पवार यांनी तांदळा येथे भेट देऊन अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी बोलताना बाळराजे पवार म्हणाले, की आपल्या भागातील शेती जायकवाडीच्या पाण्यापासून वंचित आहे, त्यामुळे शेतकरी अडचणीत असून त्यांच्यासमोर अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला नदीजोड प्रकल्प होणे आवश्यक आहे, या योजना होण्यासाठी हा लोकलढा महत्वाचा असल्याचेही ते म्हणाले. आपण लढलो नाहीत, त्यामुळे आतापर्यंत धरणाचे पाणी आपल्याला मिळाले नाही, यामुळे पिढ्यांचा विकास खुंटला आता आपण एकत्र येत लढणे गरजेचे आहे, आपण लढलो नाही तर पिढ्या वाया जातील, त्यामुळे एकत्र येत लोकलढा तीव्र करू, आपण कायम शेतकर्यांसोबत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ-पंडित

तांदळा येथे उपोषणकर्त्यांशी बोलताना माजी मंत्री बदामराव पंडित म्हणाले, की जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे. यासाठी आपण पुढाकार घेऊन उपोषणकर्त्यांचे शिष्टमंडळासह जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन मागण्यांसंदर्भात त्यांच्याशी चर्चा करू.

१४० गावातील शेतकरी उपोषण करतील+गुळवे

गेल्या सहा दिवसांपासून तांदळा येथे सुरू असलेल्या उपोषणाची दखल शासन व प्रशासन पाहिजे तशी घेत नाही. त्यामुळे अजय पाटील यांची प्रकृती खालावली आहे. शासनानी याची योग्य दाल न घेतल्यास १४० गावातील शेतकरी तांदळा येथे उपोषणास बसतील असा इशारा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी दिला.

# लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ मे**



भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचालित पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते हे आज दि.३१ मे २०२५ शनिवार रोजी आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त होत आहेत.त्यानिमित्ताने विद्यालयात विभूते यांचा सेवागौरव कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आप्पाराव यादव यांच्या हस्ते विभूते यांचा शाल,पुष्पगुच्छ,भेटवस्तू,आहेर आणि पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

सर्व शिक्षक,कर्मचारी यांनी विभूते यांच्या विषयी आपल्या मनोगतातून हृद्य आठवणींना उजाळा दिला. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती संजयराव विभूते यांनी प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होताना एकूण ३४ वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या कामाचा अनुभव सर्वांसमोर मांडत आगामी काळात वेळोवेळी शाळेच्या विविध कामात मदत करण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षीय समारोपात आप्पाराव यादव म्हणाले की, विभूते सरांनी नेहमीच शाळेच्या आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अनेक उपक्रम राबवत आपल्या कार्यशैलीतून वेगळा ठसा उमटवत,मनात कोणताही दुराग्रह न बाळगता सत्यत्याने विद्यालयाच्या प्रगतीचा ध्यास घेतला.सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांना सदैव प्रोत्साहन देत त्यांनी विद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी देखील परीश्रम घेतले असे गौरवोद्गार काढले.सर्वांनी शेवटी विभूते यांना पुढील काळात निरोगी,दीर्घायुष्य लाभावे यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लक्ष्मीबाई घडसे यांचे दु:खद निधन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ मे**



शहरापासून जवळच असलेल्या शेलापूरी येथील रहिवाशी असलेल्या लक्ष्मीबाई चंद्रभान घडसे यांचे वृद्धापकाळाने दि. ३० मे २०२५ रोजी दु:खद निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मनमिळाऊ स्वभावाच्या असल्याने लक्ष्मीबाई सर्व परिचित होत्या. त्यांच्या पाश्चात पती, एक मुलगी, तीन मुले, सुना , नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. पंचायत समिती सदस्य उषाताई श्रीहरी मोरे यांच्या आई तर बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या सासुबाई होत.

# 'एमपीएल'मध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ मे**

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे.

# अंबाजोगाईच्या स्वामी विवेकानंद पतसंस्थेतील आणखी सव्वादोन कोटींचा घोटाळा उघडकीस; १५ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ मे**

विविध घोटाळ्यांमुळे वादग्रस्त ठरलेल्या अंबाजोगाई येथील स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेतील आणखी एक मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. पतसंस्थेत सन २००० ते २०१२ या कालावधीतएकूण २ कोटी २९ लाख ९३ हजार ७१७ रुपयांचा अपहार व गैरव्यवहार झाल्याचे विशेष लेखापरीक्षक सतीष काकासाहेब पोकळे यांनी केलेल्या चाचणी लेखापरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी एकूण १५ जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पतसंस्थेचा तत्कालीन अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.सतीश पोकळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पतसंस्थेच्या लेखापरीक्षणात बँक खात्यांतील व्यवहार, रोजकिर्दीतील नोंदी आणि चेक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळल्या. काही व्यवहार बँक स्टेटमेंटमध्ये असूनही रोजकिर्दीत नाहीत, काही चेक क्र. नसलेल्या नोंदी आहेत, तर काही रक्कमा रोजकिर्दीत असून बँकेत जमा झाल्याचे पुरावे नाहीत. यामुळे संस्थेच्या आर्थिक विश्वसनीयतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

लेखापरीक्षकांच्या अहवालानुसार, संस्थेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि बँकेतील कर्मचाऱ्यांनी संगनमत करून संस्थेच्या निधीचा अपहार केला. अपहाराची सुरुवात आर्थिक वर्ष २००६-०७ पासून झाली असून, संस्थेच्या तत्कालीन प्रमुख पदांवर कार्यरत असलेल्या कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. कुरेशी सोबतच या गुन्ह्यात सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा माजी अध्यक्ष भोसले विकास प्रभाकर, प्रभाकर नरबा आरसुडे, महादेव मुकुंदराव मुंडे, कर्मचारी शिवहर महादेव अप्पा आकुसकर यांच्या सह १५ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात शासकीय लेखापरीक्षण सतिश पोकळे यांनी गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे पंधरा पैकी दहा जण हे अंबाजोगाई डीसीसी बँकेतील कर्मचारी आहेत.

यामध्ये एस.एस. लांडगे (अकॉउंट), यु.डी. देशमुख (इन्स्पेक्टर), ए.एस. पवार (लिपीक), एम.एस. सावरे (लिपीक), एम. आर. कदम (लिपीक), बी. एस. बांगर (सिनियर इन्स्पेक्टर), के. एम. केकान (लिपीक), यु.एस. नागरगोजे (लिपीक), एस.आर. खाडे (एजंट) आणि ए.एन. वाभळे (लिपीक) याचा समावेश आहे. आयपीसी ४०६, ४०९ आणि ३४ भादविनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घोटाळ्याचा मुख्य सुत्रधार सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा संस्थापक अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल असून स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेत २ कोटी २९ लाख ७१७ रूपयांचा घोटाळा करून कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याने सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्था स्थापन केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, आतापर्यंत स्वामी विवेकानंद पंतसंस्थेमधील आठ कोटीहून अधिकचा घोटाळा उघडकीस आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या वतीने वृक्ष लागवड करावी

## भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ मे**



बीड शहरातील मुख्य रस्त्यावर बीड नगरपालिकेने वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण वाढवावे जेणेकरून भविष्यामध्ये पाऊस शहरांमध्ये चांगला पडेल आणि शहरांमध्ये कुठेही पाण्याची कमतरता भासणार नाही आणि वृक्ष लावल्यानंतर वृक्षाचे संगोपन देखील ज्या ज्या ठिकाणी वृक्ष नगरपालिकेच्या वतीने लावण्यात येतील त्या त्या ठिकाणच्या नागरिकाने त्या वृक्षाची दक्षता घ्यावी व त्याचे रक्षण करावे व बीड जिल्ह्यातील मानवतेचा एक आगळावेगळा संदेश इतर महाराष्ट्रातील शहरांना देखील घेण्यासारखा वाटेल असे कार्य करावे बीड नगर परिषदेच्या वतीने वृक्ष लागवड करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे म्हटले आहे महाराष्ट्र शासन देखील सांगत आहे की झाडे लावा झाडे जगवा आणि संत देखील सांगतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही वनचरे या न्यायाप्रमाणे बीड नगर परिषदेच्या वतीने बीड शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण राखण्यासाठी नक्कीच मदत होईल आणि बीड शहराचे या वृक्षाने अतिशय सुशोभीतीकरण झाल्यासारखे दिसेल

# हर्षुताई ठाकुर यांच्या प्रखर व्याख्यानाने तरुणाईच्या अंगावर शहारे

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.३१ मे-**

माहूर शहराच्या इतिहासात प्रथमच महाराणा प्रताप यांची जयंती ही तिथीनुसार एक भव्य जन्मोत्सव म्हणून ९ मे या रोजी इंग्रजी कॅलेंडर नुसार देशभरात साजरी करण्यात येणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या जयंती दिनापासूनच २९ मे या तिथीनुसार जयंती दिनापर्यंत एक सण म्हणून साजरी करण्यात आली. या दरम्यान, २८ मे रोजी महाराणा जयंतीनिमित्त माहूर शहरासह तालुक्यातील हिंदु समाजातील नागरिकांना महाराणा प्रताप यांच्या अद्भुत शौर्य व बलाढ्य पराक्रमाची माहिती व्हावी म्हणून, छत्रपती संभाजी नगर हिंदू राष्ट्र सेना जिल्हा प्रमुख हिंदू शेरनी, रणरागिणी तथा व्याख्याती हर्षुताई ठाकुर यांच्या तरुण- तरुणींमध्ये वीररस निर्माण करणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या जीवनावर आधारित जबरदस्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्याचे स्फुरण आजही तरुणाईच्या अंगात भिनलेले असल्याचे जागोजागी सुरू असलेल्या चर्चेतून दिसून येत आहे.

या व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक गोपु महामुने हे होते.तर डॉ. पद्माकर जगताप, वेद शाळेचे केदार गुरुजी, नगरसेवक राजेंद्र केशवे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आपल्या ओजस्वी आणि पहाडी वाणीतून हिंदू शेरनी हर्षुताई ठाकुर यांनी महाराणा प्रताप यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानातून महाराणा प्रताप विषयी माहिती सांगताना उपस्थित हजारो श्रोत्यांना अगदी मंत्रमुग्ध करत खिळवून ठेवले.

यावेळी हिंदू शेरनीच्या पहाडी आवाजातील डरकाळीने मोघलांपासून ते निजामशाहीतील जुलमी राजवटीवर घणाघाती प्रहार करून आजच्या लवजेहाद, आतंकवाद या दुष्टचक्राबद्दल



कडाडून विरोध करत उपस्थितीत माता बहिणींणा आपल्या लेकीबाळींना यापासून सावध राहण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना हर्षुताई ठाकुर यांनी सांगितले कि,ज्याच्या भाल्याच्या टोकाचे शत्रूचे रक्त कधीच सुकले नाही, शत्रुच्या शिराची तहानलेली ज्यांची तलवार एकदा का युद्धभूमीवर वीजेसमान चमकली तर ती म्यानात परत गेली नाही.एकदा त्याने युद्धभूमीत योद्ध्याचे कवच धारण केले तर ते आयुष्यभर तसेच राहिले आणि पुन्हा कधीही काढले नाही.अपराजित, अजिंक्य, अजातशत्रू राजा महाराणा प्रताप, जो त्याच्या शौर्य, पराक्रम आणि बहादुरीसाठी ओळखला जातो,

मेवाडचे राजा महाराणा प्रताप, ज्यांना अंतिम फेरीत अपराजित घोषित करण्यात आले होते, परंतु ते शौर्याचे महाराणा होते, ते स्वातंत्र्याचे शूर महाराणा होते. ते एक असे नाव आहे ज्याच्या कथा इतिहासाची पाने भरतात. महाराणा प्रताप हे मेवाडचे १३ वे राजपूत राजा होते. राजस्थानातील कुंभलगड येथे जन्मलेले महाराणा प्रताप हे महाराणा उदय सिंह आणि महाराणी जयवंती यांचे पुत्र होते. महाराणा प्रताप यांनी अनेक युद्धे लढली आहेत परंतु हल्दीघाटीमध्ये मुघल शासकांविरुद्ध लढलेले युद्ध इतिहासाच्या पानांमध्ये नोंदलेले आहे. हे सर्वात प्रसिद्ध युद्ध आहे. यासोबतच जंगलात गवतापासून बनवलेली भाकरी खाण्याची कहाणी देखील लोकप्रिय आहे.आजही त्याच्या जीवनातून खूप काही शिकण्यासारखे आहे.

ज्यामध्ये , काळ इतका शक्तिशाली आहे की तो राजालाही गवतापासून बनवलेली भाकरी खायला लावू शकतो.माणसाचा अभिमान आणि स्वाभिमान ही त्याची सर्वात मोठी कमाई आहे. म्हणून, त्यांचे नेहमीच रक्षण केले पाहिजे.जे स्वतःसह आणि त्यांच्या कुटुंबासह आपल्या राष्ट्राचा विचार करतात ते खरे नागरिक आहेत.

तुमच्या गंतव्यस्थानावर पोहोचेपर्यंत कठोर परिश्रम करा.अन्याय आणि अनीति इत्यादींचा नाश करणे हे संपूर्ण मानवजातीचे कर्तव्य आहे.

जे अत्यंत कठीण परिस्थितीतही पराभव स्वीकारत नाहीत, ते पराभूत होऊनही जिंकतात.जे आनंदात आनंदी असतात आणि प्रतिकूल परिस्थितीत भीतीने नतमस्तक होतात, त्यांना यश मिळत नाही आणि इतिहास त्यांना आठवत नाही.

जरी तुम्ही सापावर प्रेम केले तरी तो त्याच्या स्वभावानुसार कधी ना कधी तुम्हाला चावेल.राज्यकर्त्याचे पहिले कर्तव्य म्हणजे त्याच्या राज्याचा अभिमान आणि सन्मान राखणे. स्वतःच्या अभिमानासमोर, सन्मानासमोर आणि स्वाभिमानासमोर जीवाचीही किंमत नाही. या गोष्टी महाराणा प्रताप यांच्या जीवनातून शिकण्यासारख्या असून, आजच्या तरुणाईने याचे आचरण करावे असे आवाहन हर्षुताई ठाकुर यांनी केले.

यावेळी महाराणा प्रताप जन्मोत्सव समिती चे अध्यक्ष विजयसिंह हजारी, उपाध्यक्ष पवन शर्मा, सचिव महेंद्रसिंह बैस यासह पदाधिकारी तथा राजपूत समाज संघटना तालुका अध्यक्ष पवन चौहान व पदाधिकारी यांचे हर्षुताई ठाकुर यांनी महाराणा प्रताप जयंती निमित्त हिंदुजणजागरणाचा माहूरच्या इतिहासात प्रथमच असा डॅशींग कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विशेष कौतुक करत अभिनंदन केले.

तर यावेळी गोरक्षक तथा बजरंगदल प्रमुख सोनू चौधरी यांची सुद्धा गोरक्षणाबद्दल अभिनंदन केले.

यावेळी मोठ्या संख्येने तालुक्यातील राजपूत समाजासह हिंदू धर्मातील महिला व पुरुष, युवक व युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. हर्षुताई ठाकुर यांच्या महाराणा प्रताप यांच्या शौर्य पूर्ण जीवनासह लव जिहाद, लँड जिहाद, गोहत्या याविषयी केलेल्या ब्रेनवॉशमुळे उपस्थित तरुणाईच्या अंगावर शहारे उभे करणाऱ्या आवाहनाला टाळ्यांच्या कडकडाटाच्या प्रतिसादाने व्याखानाचे आयोजन स्थळ कपिलेश्वर मंदिर सभागृह अक्षरशः दणाणून गेले होते.

## संक्षिप्त वृत्त

### राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती साजरी

**लोहा** -राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी



जयंती उत्सव कंधार भारतीय जनता पार्टीच्या वतीने महादेव मंदिरात आयोजन करण्यात आले होते या उत्सवाला प्रमुख उपस्थिती म्हणुन भाजप राज्यसभा सदस्य डॉ.अजित गोपछडे, दक्षिण जिल्हा अध्यक्ष डॉ.संतुराव हांबर्डे,महानगराध्यक्ष अमर राजुरकर यांच्या प्रमुख उपस्थिती होती. महादेव मंदिरात महाआरती करुन मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम राबवली राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन यांना वंदन करुन. अहिल्यादेवींच्या धर्म परायणतेचे अनुकरण करुन महादेव मंदिर परिसर स्वच्छ केला. या कार्यक्रमासाठी ग्रामीण जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, भाजपचे डॉ. सचिन पाटील उमरेकर, कंधार तालुका उत्तरचे अध्यक्ष बालाजीराव पांडागळे, कंधार शहर तालुकाध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार, लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, भास्कर पाटील ढगे, मनोहर पाटील शिंदे, दत्ता कारामुंगे, उत्तम चव्हाण,उदध्व पाटील ढेपे, सोपान पाटील लोंडे ,भास्कर पाटील जोमेगावकर,मधुकर डाकोरे,कपिल पाटील किरवले यांच्यासह परिसरातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काँग्रेसतर्फे अहिल्याबाई होळकर यांना विनम्र अभिवादन

**नांदेड** -राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त येथील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयात अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.प्रारंभी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला.सर्व उपस्थित राष्ट्रिय काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. कार्यक्रमात एकनाथ मोरे,प्रा.यशपाल भिंगे,माजी उपमहापौर अब्दुल गफार, आनंद चव्हाण, प्रफुल्ल सावंत,रेखा चव्हाण,श्रावण रॅपनवाड,महेश देशमुख, काँग्रेस कार्यालयीन सचिव उध्दवराव लांडगे,राजेश पावडे, कुमार कुर्तडीकर,सत्यपाल सावंत,अतुल पेद्देवाड, विठ्ठल पावडे, बाबुराव पांडागळे, इंजिनिअर नसीम पठाण, ज्योती कदम,शिवनंदा देशमुख, हंसराज काटकांबळे,अनिल कांबळे,अनिल उबाळे,श्याम पाटील, नंदकिशोर देशमुख,वसंत जाधव, ,गौतम शिरसाठ,दीपकसिंघ हजुरिया,अजीज कुरेशी,दिना पाटील दादाराव पुयड,मुक्तार शेख आणि रामचंद्र देठे सह आदी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले.

### स्वातंत्र्यसैनिक बालाराम यादव यांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी : बिशन यादव,

**नांदेड** -१९४८ च्या हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, १९७५ मध्ये आणीबाणीविरुद्धच्या चळवळीत समाजवादी नेत्यांसह १९ महिने नाशिक तुरुंगात तुरुंगवास भोगलेले समाजवादी संघर्षशील नेते, १९६९ पासून महाराष्ट्रात अखिल भारतीय यादव महासभेचा ध्वज फडकवणारे प्रमुख नेते आणि यादव अहिर मंडळ यदुकुल वजीराबादचे माजी अध्यक्ष, नांदेड, दिवंगत साथी बालाराम बिशनलाल यादव नांदेड यांना यादव महासभेच्या वतीने त्यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. आज २९ मे २०२५ रोजी, हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, दिवंगत साथी बालाराम यादवजी यांना त्यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी वजीराबाद, नांदेड येथील बालाराम यादव नगर येथे एक विनम्र श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नांदेड येथील वजिराबाद परिसरात त्यांच्या 'स्वातंत्र्य सेनानी बालाराम यादव नगर' या फलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. व त्यानंतर यादव अहिर मंडळ वजिराबाद नांदेड येथील 'यदुकुल' कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी अखिल भारतीय यादव महासभेचे राष्ट्रीय सरचिटणीस बिशनकुमार यादव, नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक किशोर यादव, माजी नगरसेवक धीरज यादव, डॉ. कैलाश यादव, भारतभूषण यादव, गौरव कृष्ण यादव/बालाराम यादव यांचे नातू, गोकुल यादव, संजय यादव, मुनगंटीवार पाटील, गोविंद यादव, शिवकुमार यादव, डॉ. गोपाल यादव, बाळू कुलकर्णी, चंद्रभान यादव, अजय यादव, ईश्वर बटाववाले, अमोल यादव, मनु बटाववाले, शुभम यादव, प्रशांत बोडके, प्रेम जुन्नी, बबलू चाऊस, संजय शर्मा, किशोर शर्मा, ईश्वर पाटील, गणेश चौधरी आदी उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थित होते.

### ऑलिंपियाडमध्ये नांदेडच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

**नांदेड** -जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षा २०२४-२५ मध्ये नांदेडमधील तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला. ज्ञान माता विद्या विहारच्या नायरा सुयोग चिद्दरवारने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आणि तिला आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र मिळवून दिले. दुसरीकडे, ऑक्सफर्ड द ग्लोबल स्कूलच्या वेद किशोर डोंगरवार यांनी आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र मिळवले. भार्गव करिअर अकादमीच्या पावडे आर्यने आंतरराष्ट्रीय सामाजिक अभ्यास ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय कांस्य पदक जिंकले.

# भोकर शहरातील अतिक्रमित बांधकाम काढण्याच्या मागणीसाठी उपोषणाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.३१ मे-**

शहरातील गट क्रमांक ४७९ वार्ड क्रमांक २मधील मालमत्ता क्रमांक २७८६ जुना वार्ड क्रमांक३मधील जागेवर आपले क्षेत्रफळ सोडून नगरपरिषद व शासकीय नाल्याच्या जागेत बेकायदेशीर अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आल्याप्रकरणी सदर बांधकाम पाडण्यात यावे या मागणीसाठी आदिवासी विकास संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी भोकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गट क्रमांक ४७९ मधील वार्ड क्रमांक२ मालमत्ता क्रमांक२७८६ जुना वार्ड क्रमांक३ मध्ये दिगंबर शेषराव सूर्यवंशी व गोपीनाथ शेषराव सूर्यवंशी यांनी आपले क्षेत्रफळ सोडून जास्तीच्या जागेत पाठीमागे नाल्यावर कोणतीही परवानगी न घेता ३फूट बांधकाम केले आहे शासनाची फसवणूक करून बेकायदेशीररित्या हे बांधकाम करण्यात येत आहे यापूर्वी तक्रार करूनही या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी लक्ष घालून अतिक्रम येथे झालेले बांधकाम पाडण्यात यावे अन्यथा दि.८जून पासून आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा आदिवासी संघटनेचे प्रदेश सचिव विजय मोरे, रवी गेंटेवार, गंगाधर नकलवाड यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचे आ. चिखलीकरांच्या हस्ते लोकार्पण

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.३१ मे-**

श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचा लोकार्पण सोहळा आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाले आहे

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके, शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते!वडेपुरी( लोहा) येथील भक्तांच्या नवसाला पावणारी प्रसिद्ध रत्नेश्वरी देवी मातेचे प्रसन्न,ऊर्जादाई, भक्तिमय वातावरणामध्ये मनोभावे आरती करून देवी मातेचे आशीर्वाद घेतले व श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचा लोकार्पण सोहळा आ.चिखलीकर हस्ते संपन्न झाला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, आनंदराव पाटील शिंदे, मंडळ अध्यक्ष शिवाजीराव दळवे,किशनराव डफडे, शंकरराव ढगे, बळीराम कदम, साहेबराव काळे, बंडू काळे, काशिनाथ लामदाडे, माधवराव कदम आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावीत : अशोक बोंबले

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.३१ मे-**

खरीप हंगामातील पेरणीसाठी लागणारे बी - बियाणे व रासायनिक खतांच्या खरेदीतून होणारी फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी अधिकृत कृषी दुकानातूनच बियाणे व खतांची खरेदी करावी. असे आवाहन तामसा येथील कृषी व्यापारी संघाचे अध्यक्ष अशोक बोंबले यांनी केले आहे.



खरीप हंगामातील पेरणीचे दिवस तोंडावर आले आहेत. शेतकऱ्यांची बियाणे व रासायनिक खते खरेदीची लगबग सुरू आहे. तामसा येथील कृषी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, याची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे विक्री करण्याचे नियोजन लावले आहे. यावेळी बोलतांना अशोक बोंबले म्हणाले, बाहेरचे व्यापारी खेड्यापाड्यात जाऊन बी - बियाणे, रासायनिक खतांची विकत असल्याचे कळते. चांगल्या कंपनीचे, दर्जेदार बियाणे, जास्त उत्पन्न देणारे वाण, घरपोच डिलिव्हरीचे आमिष दाखवून बियाणे विकत आहेत. अधिकृत बिल देत नसतांनाही व्यापाऱ्यांच्या आमिषाला बळी पडून शेतकरी बियाणे खरेदी करत आहे. खरेदीतून गैरप्रकार आणि शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पेरणीनंतर बियाणांची उगवण न होणे, फुलधारणा, फळधारणा न होणे, शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास अधिकृत बिल नसल्याने कोणाकडेही दाद मागणे शक्य नाही. पक्क्या बिलाचे आधारे शासन दरबारी दाद मागणे शक्य होईल. शेतकऱ्यांनी पेरणीचे साहित्याची खरेदी अधिकृत कृषी दुकानातूनच करावी. असे आवाहन कृषी विभागाकडूनही करण्यात आले. तसे तामसा कृषी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक बोंबले यांनीही केले आहे.

# किवळा तलावाचे पाणी मनपाने नांदेडकरांना उपलब्ध करुन द्यावे : माजी आ. पोकर्णा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३१ मे-**

दक्षिणचा आमदार असताना किवळा प्रकल्पाला मंजुरी आणुन दिल्यानंतर हा प्रकल्प गतवर्षी पुर्ण झाल असुन यावर्षी जलसंपदा विभागाने तलावात पाणी साठवण करुन महनगरपालिकेने नांदेडकरांसाठी सदरील तलावाचे पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी केली आहे या आशयांचे निवेदन त्यानी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्र्यांकडे केली आहे.



नांदेड शहरापासुन अवघ्या ५ कि.मी. अंतरावर असणारे किवळा साठवण तलाव हे नव्याने आता वापरण्यासाठी तयार झाले आहे आणि जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग आणि महापालिका प्रशासनाने याची पाहणी करुन हे तलाव आता शंभर टक्के पुर्णत्वास आले आहे. २००९ मध्ये मी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणुन किवळा साठवण तलाव मंजुर केला होता याचा सर्वाधिक फायदा नांदेड शहराला होणार आहे या तलावामुळे नांदेड दक्षिण मधील वाघाळा, सिडको, हडको, गोपाळचावडी, बळीरामपुर, धनेगांव, वाजेगांव यासह देगलुर नाक्या पासुन अलीकडच्या भागास या किवळा साठवण तलवाच्या पाण्याच्या लाभ मिळणार आहे.

याबरोबर नांदेड शहराजवळील सिंचनासाठी तसेच ग्रामीण पुरवठा योजनेसाठी या पाण्याचा वापर होऊ शकतो पण या तलावाची उंची अजुन १.५ मीटरने वाढविल्यानंतर या तलावात तीस टक्के अधिकचे पाणी साठविता येते. विष्णुपुरी प्रकल्पाच्या जवळ असल्यामुळे आणि तलावाच्या शेजारुन कॅनल जात असल्याने हा तलाव गोदावरी नदीच्या पावसाळयातील वाहुन जाणाऱ्या अतिरिक्त पाण्याने पुर्ण क्षमतेने भरुन घेता येतो यासाठी जलसंपदा विभागाने हा तलाव येणाऱ्या पावसाळयात पुर्ण क्षमतेने भरुन घेण्यात यावा.

नांदेड वाघाळा महापालिकेने सदरील पाणी नागरिकांना उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी केली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि.३१ मे-**

निवघा बाजार येथून जवळच असलेल्या मौजे चक्री येथील ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात, अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ. मिनाबाई पाईकराव यांच्या हस्ते करण्यात आले. तदनंतर गावासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान प्रशस्तीपत्र व पुष्पहार घालून ग्रामसेवक कौशल्य व सरपंच सौ.मीनाताई पाईकराव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक कौशल्य, सरपंच मीनाताई पाईकराव, अवधूत सूर्यवंशी, अच्युत मिरासे, चंद्रमणी पाईकराव, दैवशाला मोरे,संगीता पाईकराव, अर्चना इंगोले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# किनवट येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त महाआरती

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.३१ मे-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित त्रिशताब्दी वर्षाचा समारोप सोहळा आज किनवट येथील पैनगंगा नदीकाठावरील ऐतिहासिक शिव मंदिर प्रांगणात भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. 'शिव महाआरती'च्या माध्यमातून उपस्थितांमध्ये श्रद्धा आणि एकात्मतेचा अनोखा संगम घडला. भाजप शहर मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांच्या पुढाकाराने आणि शिव मंदिर संस्थानच्या सहकार्याने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार भीमराव केराम आणि भाजप नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ड. किशोर देशमुख उपस्थित होते. यावेळी भाजपचे शहर व तालुका पदाधिकारी, महिला आघाडी, विविध मोर्चांचे प्रमुख, कार्यकर्ते, शिवभक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'हर हर महादेव'च्या जयघोषांनी मंदिर परिसर निनादला. सोहळ्यादरम्यान, इयत्ता १० वीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कु. अक्षरा आशिष देशपांडे हिचा आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात तिचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजकांनी तर व्यवस्थापन भाजप कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. या सोहळ्याने राजमाता अहिल्यादेवींच्या कर्तृत्वाची आठवण ताजी करत समाजसेवेची प्रेरणा सर्वांना दिली. कार्यक्रमाची सांगता 'हर हर महादेव'च्या गजरात आणि देश व समाजहिताच्या संकल्पाने झाली. यावेळी सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, बाबुराव केंद्रे, राघू मामा, दत्ता आडे, संजीव रेड्डी, आशीष देशपांडे, बाळकृष्ण कदम, नविन राठोड, विश्वास कोल्हारीकर, शिवाजी आंधळे, मारोती भरकड, अजय चाडावर, बालाजी धोत्रे, संतोष चनमणवार, रवि चव्हाण, मधुकर अन्नेलवार, आदी उपस्थित होते.

# 'एसडीआरएफ'ची तुकडी नांदेडात तैनात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३१ मे-**

नांदेड जिल्ह्यात पावसाळ्यात पूरपरिस्थिती निर्माण होऊन अनेक संकटे उद्भवतात. आगामी पूरपरिस्थितीचा धोका लक्षात घेऊन मराठवाडा क्षेत्रासाठी एसडीआरएफची धुळे येथील एक तुकडी नांदेड येथे तैनात करण्यात आलेली आहे. २८ मे रोजी सकाळी ६.३० वा. या तुकडीचे नांदेड येथे आगमन झाले आहे. २८ मे ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी ही तुकडी नांदेड येथे तैनात राहणार आहे. या तुकडीमध्ये एकूण ३९ जणांचा समावेश असून त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे तीन अधिकारी व बाकी ३५ जवान आहेत.

नांदेड जिल्ह्यात गोदावरी, पैनगंगा, मांजरा, आसना, लेंडी, कयाधू, मन्याड या प्रमुख नद्या असून जिल्ह्यातील ३३७ गावे पूरप्रवण आहेत. राज्य शासनाने 'एनडीआरएफ' च्या धर्तीवर राज्यात येणाऱ्या विविध आपत्तींचा सामना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची (एसडीआरएफ) ची स्थापना केली आहे. या टीमने आज जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मराठवाडा विभागातील पूरप्रवण भागाची माहिती घेतली.

कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पिडीत व्यक्तीला पहिल्या एका तासात (गोल्डन अवर) मध्ये मदत मिळाली तर पिडीताचे प्राण आपण वाचवू शकतो. त्यामुळे विभागात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास योग्य समन्वय साधून कमीत कमी वेळेत घटनास्थळी जाऊन मदतकार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी या टीमला दिल्या.

या तुकडीचे नेतृत्व पोलीस निरीक्षक राजुक्रिष्ण सुदाम कोल्हे हे करीत आहेत तर पोलीस उपनिरीक्षक दिलीप सडया चौरे, रोहित भीमराव पानपाटील व दिनेश मधुकर तायडे हे त्यांना सहाय्य करीत आहेत. या दलाची राहण्याची व्यवस्था जिल्हा क्रीडा संकुल नांदेड येथे करण्यात आली आहे. ही तुकडीजिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असून समन्वय अधिकारी म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे हे काम पाहत असून ९४२२८७५८०८ हा त्यांचा मोबाईल क्रमांक आहे.

# बारडच्या 'जिओ'चे नेटवर्क सतत 'गुल'

## टॉवरला डिझेल घोटाळ्याचे ग्रहण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.३१ मे-**

मुदखेड तालुक्यातील बारड येथे जिओ कंपनीचे टॉवर मागच्या अनेक महिन्यापासून सतत नॉट रिचेबल असुन टॉवरला डिझेल घोटाळ्याचे ग्रहण लागल्याने जनरेटर सुविधा बंद आहे. संपर्क बंद असून इंटरनेट अभावी ऑनलाईन कारभारामध्ये मोठा व्यत्यय निर्माण झाला असल्याने ग्राहक जिओच्या कारभाराला आता कंटाळले आहेत.

बारड येथे गेल्या अनेक महिन्यापासून जिओ नेटवर्क सतत नॉट रिचेबल असून वीज गळती होताच नेटवर्कही गुल होत असते. मागच्या आठ दिवसात तर विज असतानाही वारंवार नेटवर्क 'गुल' होत असल्याने ग्राहक मात्र आता हैराण झाले आहेत. बारड येथील



जिओ टॉवर जवळ जनरेटरची सुविधा असूनही ते कायमचे बंद अवस्थेत दिसून येते. त्यामुळे मोठ्या डिझेल घोटाळ्याची सुद्धा शक्यता नाकारता येत नाही. मोठा गवगवा करून मोदी सरकारने जिओची जाहिरात करीत देशात कंपनीला मोठे मार्केट उभे करून दिले आहे. परंतु या खाजगी जिओ नेटवर्ककडे मोदी सरकारचेही आता जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसून येत आहे. त्यामुळे जिओ या खाजगी कंपनीवर सरकारचा वचक राहिला नसल्याने मोठ्या प्रमाणात रिचार्जच्या नावाखाली आर्थिक लूट चालू असून सुविधाकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. बारड भागातील बहुतांश मोबाईल धारक जिओचे आहेत. आज नेटवर्क पूर्णतः ठप्प असल्याने ऑनलाइन कारभार ठप्प झाले आहेत. त्यामुळे ग्राहकांचे आर्थिक व्यवहार बंद असल्याने ग्राहक जिओला वैतागले आहेत.

बारड येथील जिओचे नेटवर्क अनेक महिण्यापासून गुल असून इंटरनेट सुविधाही त्यामुळे मिळत नाही. नेटवर्क सुविधा बंद असल्याने कंपनीकडून आमची मोठ्या प्रमाणात लूट चालू आहे. इंटरनेटच्या अभावी ग्राहकांचे आर्थिक व्यवहारही आता ठप्प झाले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बाबाजानी दुर्रानी पुन्हा हातात घड्याळ बांधणार ?

## ८ जुनला अजित दादांच्या हस्ते प्रवेश सोहळ्याची शक्यता! समर्थकांचे सोशल मीडियावर मेसेज व्हायरल

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यातील एक मातब्बर नेते तथा मराठवाड्यातील प्रसिद्ध मुस्लिम चेहरा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी लवकरच पुन्हा अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हातात बांधणार असल्याची जोरदार चर्चा पाथरी तालुक्यात होत असून येणाऱ्या आठ जून रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते प्रवेश सोहळा होणार असल्याचे मेसेज कार्यकर्त्या तर्फे सोशल मीडियावर फिरत आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीवेळी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटी नंतर बाबाजानी दुर्राणी यांनी अजित दादा गटात राहणे पसंत केले होते परंतु विधानसभेच्या वेळी स्थानिक परिस्थिती बघता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला व परंतु तिकीट वाटपात स्थानिक जागा काँग्रेसला सुटल्याने त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करून चौरंगी लढतीत ४८ हजार मतदान मिळवुन आपला जनाधार दाखवुन दिला. निकालानंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर अत्यंत जवळचे असणारे कार्यकर्ते त्यांना सोडून गेले त्यामुळे त्यांनी काही काळ शांत राहणे पसंत केले , दरम्यानच्या काळात काका पुतणे एक होऊन राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चा जोर धरत असताना त्यांनी पुन्हा एकदा मोठ्या साहेबांची साथ सोडत अजितदादांचे घड्याळ हातात बांधण्याचे ठरवल्याचे कार्यकर्त्याद्वारे फिरणाऱ्या मेसेजच्या माध्यमातून व तालुक्यात तशा प्रकारच्या चर्चा घडताना दिसत आहे. दरम्यान आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, यांच्या निवडणुका होऊ घातल्या असून राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष वाढीचे प्रयत्न अजित दादा करतांना दिसून येत असून सत्ता स्थापनेनंतर आतापर्यंत त्यांचा दोन वेळा परभणी जिल्हा दौरा झाला असून येणाऱ्या निवडणुकीत बाबाजानी दुर्राणी या जुन्या जाणत्या अनुभवी व ग्रामीण भागात कार्यकर्त्यांची नाळ असलेले





बाबाजानी दुर्राणी व आमदार राजेश विटेकर या दोघांच्या सहकार्याने जिल्ह्यात पुन्हा जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापनेस मदत होऊन राष्ट्रवादी पक्ष पुन्हा गावा गावात पोहोचण्यासाठीचे काम सोपे होईल या दृष्टिकोनातून येणाऱ्या आठ जून रोजी अजितदादा समोर बाबाजानी दुर्राणी यांचा पक्षप्रवेश सोहळा होणार असल्याचे समजते. बाबाजानी दुर्राणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेशाच्या चर्चा तालुक्यात घडत असताना मध्यंतरी पडत्या काळात त्यांची साथ सोडून जाणारे तसेच कार्यकर्ते ते पदाधिकारी बनलेले असे जवळचे कार्यकर्ते आता अजितदादांच्या पक्षप्रवेश कार्यक्रमापूर्वी पुन्हा बाबाजानी दुर्राणी कडे आम्हास प्रवेश द्या म्हणून साकडे घालत असल्याचे चर्चा होत आहेत . मागील काही वर्षापासून परभणी जिल्ह्यातील राजकारणात आपली एक वेगळी छवी निर्माण करणारे माजी आमदार बाबा जानी दुर्रानी हे खूप दिवसाच्या संयम आणि प्रतीक्षे नंतर ॲक्शन मोडवर आलेले दिसत आहेत. अनेक वेळा विरोधकाकडून चर्चा होत होती की बाबाजानी यांचा राजकारणातील काळ आणि वेळ संपली आता त्यांचा निभाव लागणे अशक्य झाले आहे परंतु आपल्या अनुभवातून सिंहावलोकन करत संपूर्ण दुर्राणी कुटुंब आपल्या मनगटावर अजित दादा पवार यांच्या पक्षाचे घड्याळ बांधत येत्या आठ जून रोजी भरारी घेणार असल्याचे खात्री लायक माहिती मिळत आहे. मा.आमदार दुर्राणी यांचे वर्तमान आमदार राजेश विटेकर यांच्यासोबत असलेले गुरु शिष्याचे नाते, परभणी जिल्ह्यातील एक-दोन विरोधातील अपवाद सोडल्यास सर्वच नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध,विधिमंडळातील कामाचा तगडा अनुभव, राज्यस्तरीय नेते आणि सहकारी यांच्याशी असलेला समन्वय या व अशा अनेक त्यांच्या जमेच्या बाजू असुन राजकारणा व्यतिरिक्त शेती,विविध व्यवसाय आणि तल्लख बुद्धिमत्ता या सर्वांच्या जोरावर दुर्राणी कुटुंबीय हे एकसंध आहे. बाबाजानी स्वतः पाथरीचा बाबाजानीगड अबाधित राखण्यात यशस्वी ठरतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

माजी नगराध्यक्ष जुनेद खान, शिक्षण संस्थाचालक तारेख खान,याचप्रमाणे अजात शत्रू व्यक्तिमत्व पुतणे तबरेज खान आणि पत्नी माजी नगराध्यक्षा शाहिस्ताखान हे सर्वजण आपापल्या परीने पाथरी शहरातील महिला व पुरुष कार्यकर्त्यांना अडीअडचणीत कामी येऊन जोडून ठेवण्याचे काम करत असल्याने दुर्राणी फॅमिली राजकारणात वरचढ ठरत आहे. माजी आमदार बाबाजानी दुर्रानी यांच्याकडुन निवडून येण्याचा विश्वास असल्याने आणि लवकरच स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागत असल्याने त्यांना त्यांच्या पडत्या काळात सोडून गेलेले अनेक विरोधी गटातील लोक परत येण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

अनेकांनी अजितदादांच्या कार्यक्रमापूर्वी आम्हाला प्रवेश द्या अशी मनधरनी त्यांच्याकडून होत असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान बाबाजानी दुर्राणी यांच्या पक्षप्रवेशाने व आमदार राजेश दादा विटेकर व बाबाजानी दुर्राणी यांच्या मनोमिलनाने आगामी निवडणुकीत ग्रामीण भागासह न.प. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठा परिणाम होऊन राजकीय समीकरणे बदलु शकतात अशी चर्चा घडताना दिसत आहे.

## सेलूत ७ जूनला कविता मिरगाच्या काव्य रजनी

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील शब्दसह्याद्री व अक्षर प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे संचलित स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार ( दि. ०७ ) जुन रोजी शहरातील स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालयाच्या सभागृहात सायंकाळी सहा वाजता कविता मिरगाच्या काव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. कविता मिरगाच्या काव्य मैफिलीचे हे बारावे वर्षे असून या वर्षी काव्य मैफिलीत कवी ललित अधाने ( छत्रपती संभाजीनगर ), सुनिल उबाळे ( छत्रपती संभाजी नगर ), प्रिया धारूरकर ( छत्रपती संभाजीनगर ), सारिका उबाळे ( अमरावती ) हे निमंत्रित कवी सहभागी होणार आहेत. तर कवी संमेलनाचे सुत्रसंचलन गझलकार अरविंद सगर ( परभणी ) हे करतील.

कवी संमेलन यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने, महेश खारकर, यांच्या मार्गदर्शनात चंद्रशेखर मुळावेकर, डॉ. अशोक पाठक, रमेश नखाते, डॉ. सतीश मगर, डॉ. सुरेश हिवाळे, डॉ. शरद ठाकर, डॉ. काशिनाथ पल्लेवाड आदी उपस्थित राहणार आहेत.

## हानवतखेडा येथे रानडुकराच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी

**चारठाणा,/प्रतिनीधी:-** येथून जवळच असलेल्या हानवतखेडा येथील परिसरात डोंगराळ भाग व सागवनाची झाडी मोठ्या प्रमाणात होती पण काही नागरिकांनी आप आपल्या फायद्यासाठी तर काहींनी अवैध वृक्ष तोड करुन या परिसरातील सर्व झाडी संपवून टाकली यामुळेच येथील परिसरात व या जंगलात असलेले हरिण, कोल्हा, रोही,रानडुक्करासह असंख्य जंगली प्राणी स्वतः ची तहानभूक भागवण्यासाठी या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिक खावून नस्ताभुत करीत आसल्याने या शेतकऱ्यांच्या सर्व पिकाचे नुकसान होत आहेत.

तसेच काही प्राणी, वन्यजीव मानवावर हल्ले करीत आहेत.

हानवतखेडा शेत शिवारात असलेल्या ज्ञानदेव वटाणे यांच्या शेत शिवार गट नंबर २८ या शेतात दि.२८ बुधवार रोजी शेतातील दैनंदिन काम काडीकचरा वेचण्याचे काम करीत असताना मंथनाबाई ज्ञानदेव वटाणे ५० वर्ष रा.हानवतखेडा या महिलेला सायंकाळच्या पाच वाजण्याच्या सुमारास रानडुकराच्या कळपातील एका रानडुकराने महिलेला पाठीमागून धडक मारून महिलेच्या डाव्या पायाच्या पोटरीला चावा घेऊन लचका तोडल्याने ही महिला गंभीर जखमी झाली आहे या महिला महिलेवर रानडुकराने हल्ला चढवला हे निदर्शनास येतात शेतकऱ्यांनी रानडुकराला पळून लावले व ती या महिलेस तातडीने पुढील उपचारास परभणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे आज महिलांची तब्येत गंभीर असल्याचे माहिती मिळाली आहे.



## नाभिक संघटनेच्या तालुका प्रसिध्दी प्रमुखपदी कंठाळे



**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील नाभिक संघटनेच्या वतीने सोमवारी संत सेना महाराज समाज मंदिर येथे जिंतूर तालुक्यातील नाभिक समाजाची बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये नाभिक संघटनेच्या अधिकाऱ्यांनी तालुक्यातील नाभिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी समाजाच्या प्रत्येक अडीअडचणीमध्ये खंबीरपणे उभे राहणार असे स्पष्ट केले यावेळी मराठवाडा उपसंघटक कृष्णाजी कंठाळे व परभणी जिल्हा संघटक श्यामजी मस्केयांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये तालुक्यातील विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली यामध्ये नाभिक संघटनेच्या कार्याध्यक्षपदी शंकर कंठाळे, तालुका उपाध्यक्षपदी विजय भवर आणि कृष्णा सोनटक्के सचिव पदी पुरुषोत्तम कंठाळे कृषी अध्यक्षपदी शिवाजी पंडित संघटक पदी नागेश राऊत प्रसिद्ध प्रमुख पदी रामप्रसाद कंठाळे शहर कोषाध्यक्षपदी गजानन सूर्यवंशी संघटक सुशील कुबडे सचिव अंकुश मस्के सहसचिव विलास वाय गुडघे यांची निवड करण्यात आली यावेळी तालुका नाभिक संघटनेचे अध्यक्ष गजानन काळे हनुमान कंठाळे सिताराम कंठाळे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते ही निवड नाभिक संघटनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष कल्याण रावजी दळे भगवानरावजी वाघमारे पांडुरंग रावजी संपतरावजी सवणेआत्माराम जी राऊत गोविंद भालेराव यांच्या आदेशावरून ही निवड करण्यात आली आहे.



## सस्ती अदालत उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्ह्यातून पूर्णा तहसील प्रशासनाचा प्रथम क्रमांक

### तहसीलदार बोथीकर यांचा विभागीय आयुक्त गावंडे यांच्या हस्ते सत्कार

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** शासनाच्या महसूल विभागाच्या सस्ती अदालत उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांसाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल परभणी जिल्ह्यातून पूर्णा प्रथम क्रमांकावर आल्याने तहसीलदार माधवराव बोथीकर यांचा विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे सत्कार करण्यात आला आहे.

पूर्णा तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागांतर्गत सस्ती अदालत या उपक्रमात विविध गावातून अनेक गावाची शेतकऱ्या ंच्या शेत रस्त्याचे प्रश्न मार्गी लावून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल परभणी जिल्ह्यातून पूर्णा तहसील

कार्यालयाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे पूर्णा तहसील कार्यालयाचे तहसीलदार माधवराव बोथीकर यांचा शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर येथे आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. याबद्दल त्यांचे पूर्णा तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे .

## सेलू शहरात मान्सूनपूर्व वीज दुरुस्तीचे काम सुरू

### ग्रामीण भागात ४४ ठिकाणी नवीन क्षमतेचे डीपी बसवले

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू शहर व तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून वारंवार वीज खंडित होणे, डीपी जळणे, वीजपुरवठा थांबणे अशा समस्यांनी नागरिक त्रस्त होते. विशेषतः ग्रामीण भागात ही समस्या अधिक तीव्र होती. दोन-दोन, तीन-तीन दिवस वीज नसल्यामुळे सामान्य जनतेला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. गावातील पिठं दळण्यासाठी देखील वीज नसल्यामुळे बाहेर जावे लागत होते. या सर्व समस्यांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर सेलू विधानसभा क्षेत्राच्या आमदार मा. नामदार मेघना बोर्डीकर यांच्याकडे अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत मा. आमदार मेघना दीदी बोर्डीकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मान्सूनपूर्व वीज लाईन दुरुस्तीचे काम तातडीने आणि प्रभावीपणे पूर्ण करावे, जेणेकरून पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणार नाही.

महावितरण विभागानेही याला सकारात्मक प्रतिसाद देत शहरात तीन गुत्तेदारांच्या सहाय्याने वीज दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. सध्या शहरातील २५ डीपी बॉक्सची दुरुस्ती सुरू असून, किटकॅट, फ्युज, केबल बदलणे, ब्युश झाडांची कटिंग यासारखी कामे केली जात आहेत.



शहरातील जायकवाडी डीपी, जिल्हा उपरुग्णालय डीपी, समतानगर डीपी याठिकाणी आधी ६३ केव्ही क्षमतेचे डीपी होते. ते बदलून आता १०० केव्ही क्षमतेचे डीपी बसवण्यात आले आहेत. यामुळे लोड सहन करण्याची क्षमता वाढेल आणि डीपी जळण्याचे प्रमाण कमी होईल.

फक्त शहरातच नव्हे तर सेलू तालुक्यातील ४४ ठिकाणी अशा प्रकारे ६३ केव्हीऐवजी १०० केव्ही क्षमतेचे डीपी बसवण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक गावांचा वीजप्रश्न कायमचा निकाली निघणार आहे.

हे सर्व काम पुढील तीन-चार दिवसांत पूर्ण होणार असल्याची माहिती महावितरणचे उपकार्यकारी अभियंता, नामदेव केंद्रे, शहर सहाय्यक अभियंता.विजय मंत्री या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

सेलू शहरासह तालुक्यातील दुरुस्तीच्या कामाचा पाठपुरावा भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते करत आहेत. पूर्ण झाल्यानंतर मान्सूनदरम्यान वीजपुरवठा सुरळीत राहील आणि नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ येणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## एकरुखा येथे सेवापुर्ती गौरव सोहळा

**परभणी :** तालुक्यातील एकरुखा येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत दि.३१ मे रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ शिक्षक तथा शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक श्री .अनील बाबुराव जत्ती यांच्या सेवापुर्ती गौरव समारंभ सोहळ्याचे आयोजन जि.प .प्रा. शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती तारामती भगीरथ तायनाथ या उपस्थीत राहणार असुन प्रमूख पाहुणे म्हणून माजी जि.प .सदस्य दादासाहेब टेंगसे ,राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष श्री.किसनराव ईदगे राहणार आहेत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

## संबोधी'च्यावतीने आज सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळा

### विवाह सोहळ्याची सर्व तयारी अंतिम टप्यात

**परभणी ,/प्रतिनिधी-** संबोधी अकादमीच्या वतीने आज रविवार १ जून रोजी सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यास नोंदणीस मोठा प्रतिसाद मिळत आहे.

येथील महात्मा फुले विद्यालय येथे होणाऱ्या सामुहिक विवाह सोहळ्यास देश-विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंगल परिणय विधी पुज्य भदंत पय्याबोधी, नांदेड व भिक्खू संघ याच्या हस्ते संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यात आजपर्यंत २५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द झालेले आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेतंर्गत वीस हजारचे अनुदान मिळणार आहे. तसेच संबोधी अकादमीच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांना सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत.



या विवाह सोहळ्यासाठी नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळत असुन इच्छूकांनी २५ मे पर्यंत संबोधी अकादमी, महाराष्ट्र चे कार्यालय, गाळा क्रं. ६, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी येथे मो.क्र. ७७९८५४४७८६ यावर संपर्क करावा.

वधु-वर नोंदणीसाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तर मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाचा पुरावा म्हणून टी.सी.,/ दहावीची सनद / जन्म प्रमाणपत्र यापैकी एक, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यापैकी किमान एका जणाचे जातीचे प्रमाणपत्र, वधु-वराचे रहिवाशी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.


अधिक माहितीसाठी अविनाश मालसमिंदर-७७९८५४४७८६, यांच्याशी संपर्क करावा, तसेच सोहळ्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन विवाह सोहळ्याचे आयोजक संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे, भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ॲड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि.फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल.आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त मॅरेथॉन स्पर्धेला प्रतिसाद

## आ. तान्हाजी मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी दाखवली झेंडी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

भारतीय जनता पक्ष, महिला आघाडीच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य महिला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी हिरवी झेंडी दाखवली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भाजपकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवार दि ३१ मे रोजी येथील गांधी चौकातून तीन किलोमीटर धावणे महिलांच्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये मराठवाडा, विदर्भातील महिला धावपटूनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. यावेळी आ. मुटकुळे आणि जिल्हाध्यक्ष धुगे यांनी या स्पर्धेला हिरवी झेंडी दाखवल्यानंतर स्पधेला सुरूवात करण्यात आली. गांधी चौक, अग्रसेन चौक, हॉटेल गणेश इन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोस्ट ऑफीस, जवाहर रोड मार्गे पुन्हा महात्मा गांधी चौकात या स्पर्धेचा समारोप झाला.

या स्पर्धेत प्रथम प्रणील शेगोगार शेगाव, द्वितीय ऋतीका नंदेवार वाशिम, तृतीय स्नेहा चौधरी वाशिम, चतुर्थ वर्षा कदम परभणी, पाववा क्रमांक परिमाला बाबर परभणी यांच्यासह गौरी भोसले पूर्णा, पल्लवी मुटकुळे हिंगोली, पूजा जगताप हिंगोली यांनीही यश मिळवले. यावेळी गांधी चौक येथे मान्यवरांचे हस्ते खेळांडुना बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी आमदार तान्हाजीराव मुटकुळे, भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, वकील संघाचे अध्यक्ष अँड.सुनील भुक्तार, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, हमीदभाई प्यारेवाले, सदाशिव सूर्यतळ, भरत पैलवान, बाळू बांगर,श्याम खंडेलवाल, बाबा घुगे, संजय ढोके, एकनाथ बांगर, ओम कोटकर, मदनलाला, सुनिताताई मुळे, रजनीताई पाटील, कृष्णा रूहीटीया, ज्योतीताई वाघमारे, वंदना इंगळे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून रमेश गंगावणे, व्यवहारे, शिवाजी इंगोले, नितीन मोरे, अनिल लोळेवार, विश्वास वानखेडे, जिरवणकर, नांदापूरकर, सोपान नाईक, सूर्यवंशी, हनुमंत रामदास दतराव बांगर, रावसाहेब गेंदाफळे, नामदेव रणवीर, मनोज दुरे यांच्यासह शहरातील नागरिक व इतर सहकारी व भाजपा पदाधिकारी या ठिकाणी उपस्थित होते.

# उपमहानिरीक्षक उमाप यांचेहस्ते केंद्रीय मुद्देमाल कक्षाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

नांदेड परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचेहस्ते जुने पोलिस मुख्यालयात स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय मुद्देमाल कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर त्यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयातील विविध कक्षांना भेट देत पाहणी केली तसेच कार्यालय परिसरात वृक्षारोपनही केले.

नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयात पुराव्याला खूप महत्व आहे. त्याअनुषंगाने सदर पुराव्याचे जतन योग्य पध्दतीने करून वेळेत न्यायालयात हजर करण्यासाठी तसेच मुद्देमालाचे सुरक्षित व पारदर्शक व्यवस्थापन होण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून केंद्रीय मुद्देमाल कक्ष या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. सदर कक्षात जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांतील पुरावे जमा करण्यात येणार असून सदर मुद्देमाल हाताळणीमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी मुद्देमालासाठी डिजीटल नोंदी, ट्रॅकींग तसेच कोडद्वारे मुद्देमालाची ओळख अशा प्रकारे संगणकीय प्रणालीद्वारे लक्ष ठेवण्यात येते. त्यामुळे मुद्देमालातील फेरफार रोखणे आणि न्यायालयीन प्रक्रीयेतील कार्यक्षमता वाढविणे शक्य होते. केंद्रीय मुद्देमाल व्यवस्थापन कक्षाची स्थापना जप्त मालमत्ता आणि पुराव्याचे केंद्रीकृत आणि सुरक्षित व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आली आहे. या कक्षात केवळ अधिकृत कर्मचाऱ्यांनाच प्रवेश दिला जातो तसेच व्यवस्थापन कक्ष सीसीटीव्ही द्वारे तसेच पोलिस सुरक्षा गार्डच्या निगराणीत ठेवले ओहे.

मुद्देमाल कक्षाचे महत्वाचे उद्दीष्ट म्हणजे जप्त केलेली सर्व मालमत्ता आणि पुरावे केंद्रीत व सुरक्षित पध्दतीने साठवणे, डिजीटल नोंदी ठेवून ट्रॅकींग व जबाबदारी सुनिश्चित करणे, पुराव्यांच्या साखळी अबाधित ठेवणे व छेडछाड टाळणे तसेच पोलिस आणि न्यायालय यांच्यातील समन्वय सुलभ करणे अशी आहेत. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, पोनि विकास पाटील, सपोनि दिपक मस्के आदींची उपस्थिती होती.

# उगम ग्रामीण विकास संस्थेत अहिल्यादेवी होळकर जयंती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

उगम ग्रामीण विकास संस्था येथे कृषि सखी, प्रशिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या उपस्थिती मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.

सदरील जयंतीमध्ये उगम अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी बोलताना सांगितले की, त्यांनी पती व सासरे यांच्या निधनानंतर त्यांच्या राज्यात तंटा मुक्तीची संकल्पना रुजवली. शांतता, समृद्धी आणि स्थिरता टिकून ठेवली. हीच संकल्पना महाराष्ट्र शासनाने अवलंब केला आणि महाराष्ट्र भर तंटामुक्ती समितीची स्थापना केली. आता दररोज गावामध्ये शुल्क कारणावरून भांडणे होतात. शेती, संपत्ती अशा बाबीवरून भांडणे होत आहेत. आजच्या सर्वांनी तंटे होऊच नये अशी शपथ घ्यावी हीच खरी अहिल्यादेवी होळकर यांना श्रद्धांजली ठरेल असे पाईकराव यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्रातील महादेवाच्या मंदिराचे जीर्णोद्धार केला आहे.

अहिल्यादेवी यांच्या जीवनावर रेवती जाधव, दीपाली कदम यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमास सुशिला पाईकराव, सुशांत पाईकराव, रजनी चित्तेवर, प्रतिभा पवार, स्नेहा वाढवे, कृष्णा भिसे व दिशांत पाईकराव यांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विकास कांबळे यांनी केले.



**हिंगोली– येथील जूने पोलिस मुख्यालय परिसरात नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचेहस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, सुरेश दळवी, पोनि विकास पाटील आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### अग्नीपथ योजनेंतर्गत अग्निवीर भरती मेळावा

हिंगोली– सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांसाठी अग्निपथ योजनेंतर्गत अग्निवीर जवानांची भरती महार रेजिमेंट सेंटर सागर (म.प्र.) या ठिकाणी दि. २३ ते २८ जून, २०२५ पर्यंत भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यासाठी रजिस्ट्रेशन करुन घेणे अनिवार्य आहे. महार रेजिमेंट सागर कार्यालयीन भ्रमणध्वनी क्र. ८८७११८०३०५, ९८९३८३७४८७ वर मेसेजद्वारे आपले नाव नोंदवावे आणि रजिस्ट्रेशन झाल्यावर पूर्ण माहितीसाठी सेंटर सागर यांचा कार्यालयीन भ्रमणध्वनी क्र. ९६३०१४१२८९ वर संपर्क साधावा. होतकरु सैनिकांच्या पाल्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी कार्यालयीन भ्रमणध्वनी क्र. ९०२१२०८८२२ वर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा सैनिक कक्ष, हिंगोली यांनी केले आहे.

### आखाडा बाळापूरात भाजपची तिरंगा रॅली




हिंगोली– कळमनुरी तालुक्यातील बाळापुर मंडळामध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. या तिरंगा रॅलीमध्ये श्रीकांत पाटील, दिनकर कोकरे, सुरेशराव नागरे, महेश गोविंदवार, ओमप्रकाश ठमके, डॉ सुधाकर लोमटे, बबनराव हेंद्रे, गजानन पाटील बोंढारे, महेंद्रसिंग बायस, अजय कदम, शेरसिंग बावरी, ओंकार नावडे, चंद्रकांत सूर्यवंशी, तुषार सूर्यवंशी, विकास ठाकूर, जिद्दी पाटील, पुष्पाताई शिंदे यांच्या सह कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

हिंगोली– जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त व्यसनमुक्ती चळवळीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, नशामुक्त भारत अभियान, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, हरिजन सेवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ मे शनिवारी व्यसनमुक्तीपर जनजागृती करण्यात आली. जनजागृती अभियानात समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्ष शुभदा सरोदे, व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल, व्यसनमुक्ती चळवळीचे कार्यकर्ते बालाजी दुमाने, विठ्ठल सादुलवार, राधाकिशन हंचाटे, रमेश जोंधळे आदींनी योगदान दिले. वसमत शहरातील मामा चौक, झेंडा चौक, सत्याग्रह चौकामध्ये व्यसनमुक्ती जनजागृती पर पत्रकाचे वितरण नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा शुभदा सरोदे यांनी तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा दिली.

# हळद उत्पादक प्रकल्पासाठी सर्वतोपरी मदत करणार– राज्यमंत्री आशिष जयस्वाल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वसमत येथे आकार घेत असून, या माध्यमातून हळद उत्पादक शेतकरी हित जोपासण्यासाठी सदरील प्रकल्प पूर्णत्वासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दि. २९ मे २०२५ रोजी बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र वसमत येथे भेट दिली. याप्रसंगी संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. संशोधन केंद्राच्या परिसरात सुरू असलेल्या संपूर्ण कामांची पाहणी जयस्वाल यांनी केली. संशोधन केंद्राच्या सुरवातीपासून आजपर्यंतच्या संपूर्ण वाटचालीबाबत विस्तृत माहिती अध्यक्ष हेमंत पाटील यांनी मंत्री महोदयांना दिली.

या भागात मोठ्या प्रमाणावर लागवड असलेल्या हळदीसाठी संशोधन केंद्राची उभारणी किती महत्त्वाची आहे, हे सांगितले. हिंगोली सारख्या औद्योगिक क्षेत्रात मागासलेल्या भागात या प्रकल्पाच्या निर्मितीमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार असून, हळद उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार आहे. हळद प्रक्रियेसाठी लागणारे इंधन व त्यातून होणारी वृक्षतोड यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. संशोधन केंद्रातील प्रक्रिया प्रकल्पामुळे आगामी काळात वृक्षतोड होणार नाही व पर्यावरण संवर्धन होईल.

यावेळी विकास माने उपविभागीय अधिकारी वसमत, सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे प्रा. डॉ. दिगांबर बडगुजर, डॉ. पवन डोके तालुका कृषी अधिकारी, सुनील भिसे, गणेश कोरेवाड, संशोधन केंद्राचे सर्व अधिकारी, कर्मचारी, तंत्र अधिकारी रमेश देशमुख यांच्यासह हर्ष कंन्स्ट्रकशनचे अभियंता, कर्मचारी यांची उपस्थिती होती. आनंद भरोसे, विशाल कदम यांच्यासह पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थित होती.

# श्री रत्नत्रय विधान व बालसंस्कार शिबीर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

शहरातील मंगळवारा भागातील श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर व सकल दिगंबर जैन समाजाच्या वतीने २५ ते ३१ मेदरम्यान शहरात श्री रत्नत्रय विधान व बालसंस्कार शिबिर घेण्यात आले.

शहरातील महावीर भवनात २५ मेपासून २० वे बालसंस्कार शिबिरास प्रारंभ झाला. २६ मे रोजी श्री १००८ भगवान शांतीनाथ जन्मोत्सव, दिक्षा व मोक्षकल्याणक उत्सव घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्सव अध्यक्ष शैलेष मुक्कीरवार तर उद्घाटक म्हणून ज्ञायक पटणी उपस्थित होते. ध्वजारोहण वीतराग गेजलवार, विधान आमंत्रणकर्ता म्हणून विनयलता अर्पल, विधानाचार्य व प्रवचनकार म्हणून बा.ब्र. श्रेणीक जैन (जबलपूर), अशोक मांगुळकर, विनीत, अमोल महाजन, अनुभव जैन, आर्जव जैन, पर्व जैन, निर्जरा महाजन यांची उपस्थिती होती.

# हिंगोली जिल्ह्यात विकसित कृषी संकल्प अभियानाचा प्रारंभ




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ मे**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व कृषि विज्ञान केंद्र तोंडापुर, जि. हिंगोली अंतर्गत विकसित कृषि संकल्प अभियान कार्यक्रम कळमनुरी तालुक्यातील भोसी, तोंडापूर आणि वारंगा या गावांमध्ये तसेच सेनगाव तालुक्यातील ताकतोडा, साबलखेडा आणि कहाकर गावामध्ये संपन्न झाला. या अभियानाचे उद्घाटन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंग चव्हाण यांच्या हस्ते जगन्नाथ पुरी येथे झाले. त्याचे थेट प्रक्षेपण वारंगा फाटा येथील कार्यक्रमात दाखवण्यात आले. हिंगोली जिल्ह्यातही 'विकसित कृषी संकल्प अभियाना'चा उत्साहात प्रारंभ झाला. या विकसित कृषि संकल्प अभियान भेटीचा मुख्य उद्देश खरीप हंगामाच्या पूर्व तयारीमध्ये मदत करणे, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणे आणि शासनाच्या योजनांची माहिती देणे हा आहे.

या विकसित कृषि संकल्प अभियान कार्यक्रमामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषद,नवी दिल्ली केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था, नागपूर येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. ए. तिरुग्नानवेल यांनी प्रमुख मार्गदर्शन करतांना लिंबूवर्गीय पिकांचे लागवड तंत्रज्ञान, योग्य वेळेवर खत व्यवस्थापन, किड व रोग व्यवस्थापन, फवारणी करतांना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली व शेतकऱ्यांच्या शंकेचे निरसन केले.

प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरजित मुंडल यांनी माती नमुना कसा घ्यावा, त्याचे महत्त्व, माती परिक्षण नुसार खत व्यवस्थापन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. गजानन चिगुरे यांनी पावसाळ्यात जनावराची घ्यावयाची काळजी, एकात्मिक पद्धतीने किड व रोग व्यवस्थापन, गोठ्याची स्वच्छता व स्वच्छ दुध उत्पादन विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. लिंबूवर्गीय संशोधन संस्था, नागपूरचे शास्त्रज्ञ डॉ. किरणकुमार कोम्मू यांनी कीड व रोग व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले व नवीन फळबाग लागवड याविषयी जमिनीची निवड व पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले, शास्त्रज्ञ डॉ. दर्शन कदम यांनी लिंबूवर्गीय फळ पिकामध्ये बहार नियोजन कशाप्रकारे करावे याबद्दल सखोल मार्गदर्शन करून फळ पिकांना तण आणि खत व्यवस्थापन याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या अभियाना अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत किसान रथ अनेक गावामध्ये जाऊन विविध तंत्रज्ञानाविषयी माहिती देण्यात येत आहे. तसेच विविध विषयाच्या घडीपत्रिका सुद्धा शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आल्या आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सनियंत्रण कृषी विज्ञान केंद्र, हिंगोलीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके आणि नोडल अधिकारी तथा गृह विज्ञान विषय विशेषज्ञ रोहिणी शिंदे यांनी केले. या विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांचे नेतृत्व राजेश भालेराव विषय विशेषज्ञ (कृषी विद्या), अनिल ओळंबे विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) आणि डॉ. अतुल मो. मुराई, विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार) यांनी केले. त्यांना अजयकुमार सुगावे विषय विशेषज्ञ, पीक संरक्षण, साईनाथ खरात विषय विशेषज्ञ मृदा शास्त्र, डॉ. कैलास गीते कार्यक्रम सहाय्यक पशु विज्ञान यांनी सहाय्य केले.

या कार्यक्रमांमध्ये जिल्ह्यातील शेतकरी, महिला शेतकरी आणि ग्रामीण युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. इफकोचे प्रतिनिधी श्री. गोराड आणि आय.पी.एल.चे प्रतिनिधी यांनी देखील कृषि फवारणीसाठी ड्रोन प्रात्यक्षिकासह सहभाग घेतला. या कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांकडून अभिप्राय नोंदवण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय ठाकरे, गुलाबराव सूर्यवंशी, मारुती कदम, ओमप्रकाश गुडेवार व संतोष हाणवते यांचे मोलाचे सहकार्य लाभले.